सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
Scan this QR code using the WhatsApp camera to join this group
क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा
https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026
❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - २०७ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ मंगळवार दि. १६ सप्टेंबर २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लांबणीवर

## ३१ जानेवारी २०२६ पर्यंत मुदतवाढ

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६मुंबई**

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आता पुढच्या वर्षी होणार आहेत. ३१ जानेवारी २०२६ पर्यंत निवडणूक प्रक्रिया पार पाडावी असे आदेश सुप्रीम कोर्टाने दिले आहे. निवडणुकीसाठी मुदतवाढ मिळावी यासाठी राज्य निवडणूक आयोग आणि सरकारने सुप्रीम कोर्टात अर्ज दाखल केला होता. त्यावर सुनावणी करताना दोन्ही बाजूचा युक्तिवाद ऐकून ३१ जानेवारी २०२६ पर्यंत निवडणूक प्रक्रिया पुढे ढकलण्यास मान्यता दिली आहे. त्यामुळे महापालिका, जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकात पुढच्या वर्षी होणार हे जवळपास स्पष्ट झाले आहे.

आजच्या सुनावणीत सुप्रीम कोर्टाने राज्य निवडणूक आयोग आणि राज्य सरकारला फटकारले. आमच्याकडे पुरेसे ईव्हीएम नाही, गरजेनुसार मनुष्यबळ नाही आणि सणासुदीचे दिवस आहेत त्यामुळे निवडणूक पुढे ढकलण्यात यावी अशी मागणी राज्य निवडणूक आयोग आणि राज्य सरकारने सुप्रीम कोर्टात केली होती. त्यावर कोर्टाने म्हटलं की, राज्याच्या निवडणूक आयोगाला ज्या ज्या गोष्टीची आवश्यकता आहे त्याबाबत राज्याच्या सचिवांना पत्र लिहावे, ३१ ऑक्टोबरपर्यंत तुम्ही कर्मचाऱ्यांची मागणी करा. आम्ही ४ महिन्यांमध्ये निवडणूक घेण्याचे आदेश दिले होते. मग आता उशीर का होतोय असा प्रश्न कोर्टाने विचारला.

तर आम्ही निवडणुकांची प्रक्रिया सुरू केली आहे. ती तातडीने होणे शक्य नाही म्हणून कालावधी वाढवून हवा असं राज्य




निवडणूक आयोगाने सुनावणीत म्हटलं. त्यावर सप्टेंबर ते जानेवारी इतका वेळ तुम्हाला का हवा असं कोर्टाने विचारले. त्यावर आम्हाला एतच् नोव्हेंबरमध्ये मिळणार आहेत. त्याशिवाय मनुष्यबळाची कमतरता आहे. त्यामुळे या प्रक्रियेला वेळ लागतोय असा युक्तिवाद त्यांनी मांडला. त्यावर सुप्रीम कोर्टाने आदेश काढत ३१ जानेवारी २०२६ पर्यंत आम्ही तुम्हाला मुदतवाढ देतो. तुमच्या कामात गती आणा. वेळापत्रक निश्चित करत ३१ जानेवारीच्या आत महाराष्ट्रातील सर्व प्रकारच्या निवडणूका पूर्ण झाल्या पाहिजेत असं कोर्टाने सांगितले.

दरम्यान, या प्रकरणात आदेश काढताना ३१ जानेवारी २०२६ नंतर कुठल्याही प्रकारची मुदतवाढ दिली जाणार नाही असं सुप्रीम कोर्टाने स्पष्ट सांगितले आहे. आजच्या सुनावणीत सुप्रीम कोर्टाने राज्य निवडणूक आयोगाच्या कामकाजावर नाराजी व्यक्त केली. मनुष्यबळाची कमतरता आहे त्याबाबत राज्य सरकारला कळवावे आणि ते सुप्रीम कोर्टाच्या निदर्शनास आणावे. ज्या गोष्टींची गरज भासत असेल त्यांना पत्र पाठवतायेत याबाबत पुरावे जमा करा असं सुप्रीम कोर्टाने सांगितले.

### वेळोवेळी कारणे देऊन निवडणुका लांबणीवर पाडल्या जातायेत

सुप्रीम कोर्टाच्या सुनावणीत राज्य निवडणूक आयोगाने जो अर्ज सादर केला, तो पटलावर आला नाही. ६ मे रोजी सुप्रीम कोर्टाने आदेश दिले होते. मात्र निवडणूक न घेतल्याने कोर्टाने नाराजी व्यक्त केली. वेळेच्या आत या निवडणुका व्हायला पाहिजे होत्या असंही कोर्टाने म्हटलं. वेळोवेळी कारणे देऊन निवडणूक लांबवली जात आहे. बोर्ड परीक्षेचे कारण देतायेत त्यामुळे निवडणूक मार्चपुढे जातील असा आक्षेप आम्ही नोंदवला. त्यावर राज्य निवडणूक आयोगाकडून कोर्टाने निवडणूक लांबणीवर जाण्याची कारणे विचारली. त्यावर ३१ जानेवारी २०२६ पर्यंत निवडणूक प्रक्रिया पार पाडण्याचे आदेश कोर्टाने दिले अशी माहिती याचिकाकर्त्यांचे वकील देवदत्त पालोदकर यांनी दिली.

## परशुराम आर्थिक विकास महामंडळाच्या अध्यक्षाला मंत्रिपदाचा दर्जा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६मुंबई**

राज्यातील ब्राह्मण समाजातील आर्थिक दुर्बल घटकांच्या विकासासाठी स्थापन करण्यात आलेल्या परशुराम आर्थिक विकास महामंडळाच्या अध्यक्षांना आता मंत्रिपदाचा दर्जा देण्यात आला आहे. राज्य सरकारने याबाबत निर्णय घेतला. त्यामुळे परशुराम आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष आशिष दामले यांना मंत्रिपदाचा दर्जा मिळणार आहे.

गेल्या वर्षी, एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना परशुराम आर्थिक विकास महामंडळाला मंजुरी देण्यात आली होती. ब्राह्मण समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना शिक्षण, व्यवसाय उभारणी आणि अन्य सहाय्यता देण्यासाठी महाराष्ट्र शासनाने हा निर्णय घेतला होता. आशिष दामले हे सध्या या महामंडळाचे अध्यक्ष आहेत.

# महाराष्ट्रात ७९ ठिकाणी शेतकरी भवन उभारणार

## राज्य मंत्रिमंडळाने घेतले ८ महत्त्वाचे निर्णय

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६मुंबई**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत आज राज्य मंत्रिमंडळाची बैठक पार पडली. या बैठकीत विविध ८ महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. त्यात प्रामुख्याने राज्यातील पायाभूत सुविधांसाठी असलेल्या उपसमितीला मंत्रिमंडळ समितीचा दर्जा देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या समितीत मुख्यमंत्र्यांसह इतर मंत्री सदस्य म्हणून असतील. त्याशिवाय शेतकऱ्यांसाठी राज्यातील विविध बाजार समितीमध्ये ७९ शेतकरी भवन उभारण्याच्या प्रस्तावालाही मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे.



महाराष्ट्र निमेशन, व्हिज्युअल इफेक्ट्स, गेमिंग, कॉमिक्स आणि एक्सटेंडेड रिलिटी धोरण २०२५ जाहीर. सन २०५० पर्यंतचे नियोजन. सुमारे ३ हजार २६८ कोटी रुपयांचा आराखडा (उद्योग विभाग)

राज्याच्या पायाभूत सुविधा उपसमितीला मंत्रिमंडळ समितीचा दर्जा.राज्यातील पायाभूत प्रकल्पांबाबत यापुढे उपसमिती यापुढे मंत्रिमंडळ समिती म्हणून कामकाज करणार (नियोजन विभाग)

अकोला येथील दि निळकंठ सहकारी सूतगिरणीला खास बाब म्हणून शासन अर्थसहाय मिळणार. अर्थसहाय्याच्या ५:४५:५० या गुणोत्तरानुसार निवड (वस्त्रोद्योग विभाग)

मागासवर्गीय शासकीय वसतिगृहातील विद्यार्थ्यांच्या दैनंदिन निर्वाह भत्ता तसेच विद्यार्थीनीसाठीच्या स्वच्छता प्रसाधन भत्त्यात सुमारे दुपटीने वाढ. हजारो विद्यार्थी- विद्यार्थिनींना दिलासा (सामाजिक न्याय व विशेष सहाय्य)

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शेतकरी भवन योजनेस पुढील दोन वर्षांसाठी मुदतवाढ. राज्यभरात ११६ बाजार समित्यांमध्ये नवीन शेतकरी भवन बांधण्यासाठी, व अस्तित्वातील भवनांच्या दुरूस्तीसाठी असा एकूण १३२ कोटी ४८ लाखांचा खर्च. विविध ठिकाणी ७९ नवीन शेतकरी भवन उभारण्याचे प्रस्ताव. (सहकार व पणन विभाग)

आधुनिक संत्रा केंद्र उभारण्याच्या योजनेस २ वर्षे मुदतवाढ. नागपूर, काटोल, कळमेश्वर, (जि.नागपूर), मोर्शी (जि.अमरावती ) व संग्रामपूर, (जि.बुलढाणा) येथे आधुनिक संत्रा केंद्र उभारण्यात येत आहेत. मुदतवाढीसह योजनेच्या स्वरुपात अनुषंगिक बदल करण्यास मान्यता (सहकार व पणन विभाग)

भंडारा ते गडचिरोली दरम्यान ९४ किलोमीटरचा द्रुतगती महामार्ग. प्रवेश नियंत्रित द्रुतगती महामार्ग प्रकल्प महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या माध्यमातून उभारण्यात येणार. प्रकल्पाच्या आखणीस व भूसंपादनास मान्यता. भुसंपादनासह अनुषंगिक ९३१ कोटी १५ लाख रुपयांच्या खर्चास मान्यता. (सार्वजनिक बांधकाम विभाग)

नवीनकरणीय ऊर्जा प्रकल्प उभारणीसाठी संयुक्त उद्यम कंपनी. महानिर्मिती व मे.सतलज जलविद्युत निगम लि. यांची संयुक्त उद्यम कंपनी स्थापन करण्यास मान्यता. राज्यभरात ५ हजार मेगावॅट क्षमतचे प्रकल्प विकसित करणार (ऊर्जा विभाग)

# समृद्धी महामार्ग बनेल 'ग्रीन हायवे' वनविभागाला दिली १० लाख वृक्ष लागवड आणि देखभालीची जबाबदारी

## वनविभागाकडे जागेचे हस्तांतरण : नागपूर ते मुंबई दरम्यान ७०१ किमी अंतरावर लागणार झाडे

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६अमरावती**

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाला वृक्षलागवडीत अपयश आल्याने समृद्धी महामार्गावरील नागपूर ते मुंबई या ७०१ किमी अंतरावर रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी झाडे लावण्याची जबाबदारी आता वनविभागाकडे सोपविण्यात आली आहे. वनविभागच झाडे लावणार असून पुढील पाच वर्षे त्यांची देखभाल करणार आहे. त्याअनुषंगाने जागेच्या हस्तांतरणाची प्रक्रिया पूर्ण झाली आहे.




नागपूर ते मुंबई समृद्धी महामार्ग वाहतुकीसाठी खुला होऊन तीन वर्षे उलटली असली तरी या मार्गावरील आवश्यक सुविधा आणि पर्यावरणीय बाबींवर हायवे ॲथॉरिटीने पुरेसे लक्ष दिले नाही, अशी टीका होत आहे. ७०१ किमी लांबीचा हा मार्ग हिरवागार करण्यात महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाला (एमएसआरडीसी) अपयश आले आहे. यापूर्वी एमएसआरडीसीने समृद्धीवर उंच झाडे लावण्याचे कंत्राट एका खासगी कंपनीला दिले होते. मात्र, संबंधित कंपनी ही जबाबदारी पार पाडण्यात अपयशी ठरली. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील हायवे, समृद्धी महामार्ग, राज्य महामार्गावर १० कोटी वृक्ष लागवड, आंतर वृक्षरोप वनाची जबाबदारी वनविभागाला सोपविली आहे. त्यानुसार वनविभाग समृद्धी महामार्ग हिरवागार करण्याचे काम हाती घेणार आहे.

नागपूर ते मुंबई यादरम्यान ७०१ किमी अंतराच्या समृद्धी महामार्गावर रस्त्याच्या दोन्ही बाजू तसेच रस्ता दुभाजकाच्या मधोमध उंच झाडे, फुलझाडे लावण्यासाठी 'एमएसआरडीसी' आणि वनविभाग यांच्यात ५ वर्षांसाठी करार झालेला आहे. या करारानुसार वनविभाग समृद्धी महामार्गावर दिलेल्या जागेवर लवकरच झाडे लावणार आहे. तशा सूचना वनविभागाने संबंधित वनाधिकाऱ्यांना दिल्या आहेत.समृद्धी महामार्ग 'ग्रीन हायवे' करण्यासाठी वनविभाग यंदा दोन व तीन रांगेत उंच झाडे लावणार आहे. लागवड केलेल्या झाडांची तब्बल ५ वर्षे देखभाल, सुरक्षेची जबाबदारी वनविभागाची असेल. ५ वर्षांनंतर वाढलेली झाडे वनविभाग 'एमएसआरडीसी'ला ताब्यात देईल. समृद्धी महामार्ग ग्रीन हायवे करण्यासाठी रस्त्याच्या दोन्ही बाजूने १० लाख वृक्ष लागवड करण्यात येणार आहे. याशिवाय रस्ता दुभाजकात शोभिवंत फुलझाडे आणि इतर प्रजातीचे झाडे लावण्यात येणार आहेत. तसे नियोजन वनविभागाने केलेले आहे.

### पाच किमी अंतरावर एकाच प्रजातीच्या झाडांची लागवड होणार

समृद्धी महामार्गावर पाच किमी अंतरावर एकाच प्रजातीच्या झाडांची लागवड केली जाणार आहे. यात वड, पिंपळ, उंबर, नादुख, पिंपरन, आपटा, काटेसावर, निम, पिचकारी, शिसु, करंज या झाडांच्या प्रजातीसह कन्हेर, बोगनवेल, बॉटल ब्रश, मोगरा, फायकस, शंकासूर, फ्रींग, चाफा-बहावा, गुलमोहर, निळा मोहोर आदी प्रजातींचा समावेश असणार आहे.

# टीम इंडियाला अपोलो टायर्स प्रत्येक मॅचमागे ४.५ कोटी रुपये मोजणार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६मुंबई**

केंद्र सरकारने संसदेत ड्रीम ११ या ऑनलाईन जुगाराच्या ॲपवर बंदी आणल्यानंतर बीसीसीआयने टीम इंडियाच्या जर्सीवरून ड्रीम ११ चे नाव वगळले होते. यानंतर नव्या स्पॉन्सरच्या शोधात टीम इंडिया होती. आता तो शोध संपला आहे. अपोलो टायर्सने बीसीसीआयसोबत डील पक्की केली आहे. प्रत्येक सामन्यामागे अपोलो कंपनी ४.५ कोटी रुपये मोजणार आहे. ही रक्कम ड्रीम ११




पेक्षा ५० लाखांनी जास्त आहे.

अपोलो टायर्स आणि बीसीसीआयमध्ये ही डील झाली आहे. आता टीम इंडियाच्या जर्सीवर अपोलो टायरचे नाव दिसणार आहे. हा नवा करार २०२७ पर्यंत लागू राहणार आहे.

यामध्ये एकट्या बीसीसीआयचा फायदा नाही तर अपोलो टायर्सचाही फायदा होणार आहे. भारतात सर्वात मोठी टायर कंपनी ही एमआरएफ आहे. अपोलोला एमआरएफच्या तुलनेत आपली ब्रँड व्हॅल्यू वाढविण्याची संधी मिळणार आहे.

केंद्र सरकारने बेटिंग ॲपवर बंदी आणल्यानंतर बीसीसीआयने गेमिंग, बेटिंग, क्रिप्टो आणि तंबाखू उत्पादने बनविणाऱ्या कंपन्या बोली लावू शकणार नाहीत, असे स्पष्ट केले होते. याशिवाय खेळाडूंवर खासगी जाहिराती करण्यास बंधणे येत असल्याने खेळाच्या वस्तू बनविणाऱ्या कंपन्या, बँका आणि फायनान्शिअल कंपन्यांना देखील लांब ठेवण्यात आले होते. कोल्ड ड्रिंक, पंखे, मिक्सर, इन्शुरन्स सारख्या कंपन्यांनाही बोली लावण्यापासून मनाई करण्यात आली होती.

# महाराष्ट्रावर कर्जाचा बोजा अन् मोदींचा वाढदिवस कर्जाच्या पैशातून राऊतांचा हल्लाबोल

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६मुंबई**

ठाकरे गटाचे नेते, खासदार संजय राऊत यांनी महाराष्ट्राच्या आर्थिक स्थितीबद्दल चिंता व्यक्त केली आहे. यावेळी संजय राऊतांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या येणाऱ्या वाढदिवसानिमित्त सरकारी स्तरावर साजरा करण्यात येणाऱ्या वाढदिवसावर निषेध दर्शविला आहे. संजय राऊत यांच्या मते, महाराष्ट्र कर्जबाजारी असताना मोदींच्या वाढदिवस साजरा करण्यासाठी सरकारी निधी खर्च करणे हा आर्थिक गुन्हा आहे. ते पुढे असेही म्हणाले की, जनतेनेच स्वतःहून मोदींचा वाढदिवस साजरा करावा, सरकारी यंत्रणेला यात हस्तक्षेप करण्याची



गरज नाही. या वक्तव्यात त्यांनी शरद पवार यांच्या नेपाळमधील राजकीय घडामोडींबद्दलच्या विश्लेषणाला पाठिंबा दिला आहे. राऊत यांचे हे वक्तव्य महाराष्ट्राच्या राजकारणात एक नवीन वाद निर्माण करणारे ठरू शकते.

# पुराव्यांवर खाडाखोड असेल तर मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र देऊ नका; ओबीसी उपसमितीत एकमुखाने निर्णय

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६मुंबई**

जात प्रमाणपात्राचे सर्टिफिकट वाटप करताना कोणतेही खाडाखोड झालेले कागदपत्रं ग्राह्य धरू नये आणि त्यावर प्रमाणपत्र वाटप करू नये असा महत्त्वाचा निर्णय ओबीसी उपसमितीच्या बैठकीत झाला आहे. कोणत्याही चुकीच्या पुराव्यांवर कुणबी सर्टिफिकेट देऊ नये असा निर्णयही या बैठकीत झाला. ओबीसी उपसमितीचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या




बैठकीत अनेक विषयांवर चर्चा झाली.

ओबीसी मंत्रालयाला २९०० कोटी रुपये मिळायला हवी. राज्यात २२ ओबीसी महामंडळे आहेत. त्याला देखील निधी मिळायला हवी. त्याबाबतची पुरवणी मागणी सादर करण्याचा निर्णय झाला आहे. या बैठकीत एकूण १८ ते १९ विषयांवर चर्चा झाल्याची माहिती चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

मराठा समाजाला कुणबी सर्टिफिकेट देताना पुराव्यांवर कोणतीही खाडाखोड नको, ओव्हर राईटिंग नको असा महत्त्वाचा निर्णय ओबीसी उपसमितीच्या बैठकीत झाला. असे पुरावे सादर करताना

खोडतोड कशी होते असे पुरावे आज दाखविले गेले. त्यामुळे चुकीच्या पुराव्यांवर, खोट्या पुराव्यांवर सर्टीफीकेट देऊ नये अशी मागणी करण्यात आली.

### ओबीसींचा निधी मिळावा

ओबीसी महामंडळांसाठी ३२०० कोटी रूपये जे जाहीर झाले आहेत ते पैसे मिळावेत अशी मागणी करण्यात आली. ओबासीच्या नोकरभरतीचा अनुशेष भरून निघावा ही मागणी करण्यात आली. ओबीसी समाजासाठी असलेली कोणतीही विशेष शिष्यवृत्ती बंद पडू नये, होस्टेल सगळ्या ठिकाणी असावे. ओबीसीचे विंभागीय कार्यालय असावे अशीही मागणी करण्यात आली.

## संपादकीय ......

# राजकारणाच्या गाजावाज्यात गुदमरणारा अन्नदाता

*महाराष्ट्रात शेतकरी आत्महत्या हा विषय दशकानुदशके चालत आलेला आहे. विदर्भ आणि मराठवाडा हे दोन भाग तर आत्महत्यांचे केंद्र बनले आहेत. येथे शेतकरी एका हंगामाच्या पिकावर जगतो, ते पीक जरी नासले तरी त्याचे जीवन उद्धवस्त होते. सध्या महायुती सरकारच्या काळात ही शोकांतिका अधिक तीव्र होत चालली आहे. काँग्रेसचे वरिष्ठ नेते विजय वडेट्टीवार यांनी नुकतीच समाजमाध्यमांवरून सरकारवर जोरदार टीका केली. त्यांनी स्पष्ट शब्दात म्हटले की, महायुती सरकारने शेतकर्यांना कर्जमाफीचे गोडवे गायले, त्यांच्या भोळ्या-भाबड्या विश्वासाचा गैरफायदा घेतला आणि निवडणुकीत मते मिळवली, पण प्रत्यक्ष सत्तेत आल्यावर हे वचन पूर्ण करण्यात पूर्णपणे अपयशी ठरले. याचा थेट परिणाम म्हणजे केवळ आठ महिन्यांत तब्बल १ हजार १८३ शेतकर्यांनी आत्महत्या केल्या आहेत. यात पश्चिम विदर्भातील ७०७ आणि छत्रपती संभाजीनगर विभागातील ५२० शेतकरी आहेत. वडेट्टीवार यांच्या दाव्याचा विचार करता, महाराष्ट्रात दररोज सुमारे पाच शेतकरी आत्महत्या करतात.*

*शेतकरी आत्महत्यांच्या मागील मूळ कारणे अनेक आहेत. शेती हा व्यवसाय आजही पावसावर अवलंबून आहे. पाऊस वेळेवर आणि प्रमाणात पडला तर शेतकर्याला थोडा दिलासा मिळतो, पण पावसाचा नादुरुस्त पॅटर्न शेतकर्याचे जीवन उद्धवस्त करतो. एका बाजूला अतिवृष्टी तर दुसर्या बाजूला पावसाची टंचाई, गारपीट, वादळ अशा नैसर्गिक आपत्तींचा शेतकर्याला सामना करावा लागतो. यामुळे पिकांचे नुकसान होते आणि उत्पन्नावर पाणी फिरते. याच वेळी उत्पादन खर्च वाढतो. बियाणे, खते, कीटकनाशके, डिझेल, मजुरी या सर्व गोष्टींच्या किमती सातत्याने वाढत आहेत. पण बाजारात मिळणारा भाव तसाच स्थिर किंवा अनेकदा किमान हमीभावापेक्षा कमी असतो. अशा परिस्थितीत शेतकरी कर्ज घेतो, तेही अनेकदा बँक आणि खासगी सावकार या दोन्हीकडून. बँकांचे कर्ज न मिळाल्यास सावकारांच्या दरवाजावर धाव घ्यावी लागते आणि तेथे व्याजाचा दर इतका जास्त असतो की कर्जाचा डोंगर वाढत जातो. या सगळ्या आर्थिक घुसमटीबरोबर सामाजिक दबावही शेतकर्याला पेलावा लागतो. कुटुंबाची जबाबदारी, मुलांचे शिक्षण, विवाह, वैद्यकीय खर्च हे सर्व हातातल्या पैशाशिवाय भागवणे अशक्य होते. गावोगावी प्रतिष्ठेचे राजकारण आहे. शेतकरी आपल्या मुलांना, पत्नीला, घराला जगवण्यासाठी कर्ज घेतो, पण पिके निघाली नाहीत की तो समाजात तोंड दाखवण्यासही लाजतो. अशा परिस्थितीत आत्महत्या हा एकमेव मार्ग शिल्लक राहतो. राजकारण या शोकांतिकेत महत्त्वाची भूमिका बजावते. निवडणुकीत प्रत्येक पक्ष शेतकर्यांचे गोडवे गातो. महायुती सरकारनेही त्याला अपवाद केला नाही. त्यांनी संपूर्ण कर्जमाफीचे आश्वासन दिले.*

*शेतकर्यांनी या वचनावर विश्वास ठेवला आणि मोठ्या संख्येने महायुतीला मते दिली. परंतु सत्तेत आल्यावर महायुतीने तोंड फिरवले. शासनाच्या मते, संपूर्ण कर्जमाफी देणे शक्य नाही, फक्त अत्यंत अडचणीत असलेल्या शेतकर्यांना मदत केली जाईल. त्यासाठी समिती नेमण्यात आली, ज्याचा अहवाल अद्याप आलेला नाही. ही भूमिका म्हणजे सरळसरळ फसवणूक आहे. शेतकरी या आश्वासनाच्या भरवशावर बँकेकडे कर्जाची परतफेड पुढे ढकलत होते. आता जेव्हा सरकारने कर्जमाफी नाकारली, तेव्हा त्यांच्यावर परतफेडीचा डोंगर कोसळला. बँका आणि सावकारांच्या दडपणाखाली ते आत्महत्या करत आहेत. महायुती सरकारने दिलेली इतर आश्वासनेही तशीच धूळ खात पडली आहेत. मृत शेतकर्यांच्या कुटुंबांना तात्काळ मदत मिळेल असे सांगितले गेले, पण प्रत्यक्षात मदत मिळण्याआधी कुटुंबांना शेकडो कागदपत्रे जमा करावी लागतात. पात्रता निकष इतके कठोर ठेवले आहेत की अनेक कुटुंबे मदतीपासून वंचित राहतात. 'लाडकी बहीण' योजनेतून महिलांना मासिक आर्थिक मदत मिळेल असे सांगण्यात आले होते, पण निधीअभावी त्यात अडथळे निर्माण झाले. सिंचन प्रकल्प राबवले जातील, पाण्याचे योग्य नियोजन होईल असेही आश्वासन दिले गेले होते, पण प्रत्यक्षात कोणताही ठोस बदल झाला नाही. शेतकर्यांची सर्वात मोठी मागणी असलेली किमान आधारभूत किंमतीवर कायदेशीर हमी याबाबतही कोणतीही पावले उचलली गेली नाहीत.*

*थोडक्यात, सरकारला शेतकर्यांच्या जीवनमरणाशी काहीही देणेघेणे नाही. निवडणुकीत मते मिळवून सत्ता मिळाल्यावर त्यांना शेतकर्यांच्या व्यथा विसरायला वेळ लागत नाही. आत्महत्यांचा आकडा हे सरकारच्या अपयशाचे मोठे प्रमाणपत्र आहे. आज शेतकर्यांसाठी मानसिक आरोग्य सल्ला केंद्रे, समुपदेशन सुविधा, आधार गट यांची गरज आहे. परंतु याकडे कोणी लक्ष देत नाही. सरकारला शेतकरी हा फक्त निवडणूक जिंकण्याचे साधन वाटतो. या सर्व परिस्थितीत उपाययोजना दोन प्रकारच्या असायला हव्यात. तात्काळ आणि दीर्घकालीन. तात्काळ उपाययोजनांत त्वरित कर्जमाफी, नुकसानभरपाई वेळेवर मिळणे, विमा दावे तातडीने मंजूर होणे, मृत शेतकर्यांच्या कुटुंबांना अडथळ्यांशिवाय मदत मिळणे यांचा समावेश होतो. दीर्घकालीन उपाययोजनांत सिंचन व्यवस्थेचा विकास, पावसावर अवलंबून असलेल्या भागांना स्थायी जलस्रोत उपलब्ध करून देणे, उत्पादन खर्च कमी करण्यासाठी अनुदान देणे, पिकांच्या किमतीत स्थिरता आणण्यासाठी किमान हमीभावावर काटेकोर अंमलबजावणी, शेतमाल थेट ग्राहकांपर्यंत पोहोचवण्याची बाजारपेठ उपलब्ध करून देणे यांचा विचार करावा लागेल.*

# बोंडअळीपासून कपाशीचं संरक्षण हवंय?
## मग 'हा' सापळा लावा आणि कीड आटोक्यात ठेवा



**दि.१६विदर्भ प्रजासत्ताक**

कपाशीवरील बोंड अळीच्या पतंगाची मादी नराला आकर्षित करण्यासाठी विशिष्ट प्रकारचा गंध सोडते. असा गंध कृत्रिमरीत्या तयार करून गोळ्याच्या स्वरूपात (ल्यूर) वापरला जातो. त्या प्लास्टिकच्या सापळ्यात पतंग अडकतात व याद्वारे गुलाबी बोंड अळीवर नियंत्रण मिळविता येते.

पिकातील किडीच्या नियंत्रणासाठी एकात्मिक कीड व्यवस्थापन महत्त्वाचे आहे. यामध्ये मशागत, कीड प्रतिकारक वाणाचा वापर यासह यांत्रिक, भौतिक, जैविक पद्धतींचा संयुक्तिक वापर केला जातो.

किडींची संख्या आर्थिक नुकसान पातळीच्या खाली ठेवण्याचा प्रयत्न शेतकऱ्यांनी करणे महत्त्वाचे आहे. कीटकनाशकांचा मर्यादित आणि अचूक वापर केल्यास पिकांचे नुकसान टाळण्यासोबतच वातावरणाचा समतोल राखता येतो.

**कामगंध सापळा म्हणजे काय ?**

कापसावरील बोंड अळ्यांचा मादी पतंग विशिष्ट प्रकारचा गंध आपल्या शरीराद्वारे सोडतात, नर पतंग त्याकडे आकर्षिले जातात. असे गंध कृत्रिमरीत्या तयार करून गोळ्यांच्या स्वरूपात सापळ्यात वापरले जातात. या गोळ्यांना ल्यूर अथवा सेप्टा म्हणतात, त्या प्लास्टिकच्या सापळ्याला कामगंध सापळे म्हणतात.

गंधामुळे विजातीय पतंग सापळ्यात जातात आकर्षिले

पतंगवर्गीय कीटकांमध्ये मादी आणि नर यांचे मिलन होण्यासाठी एक विशिष्ट प्रकारचा गंध सोडला जातो. काही कीटकांच्या प्रजातींमध्ये नराद्वारे सोडलेल्या गंधाकडे स्वजातीय मादी आकर्षित होते, तर काहींमध्ये मादीद्वारे नराला आकर्षून घेण्यासाठी आपल्या शरीरातून गंध सोडते. अशा गंधामुळे विजातीय पतंग आकर्षिले जातात.

कीड नियंत्रणासाठी कामगंध सापळ्याचा वापर केल्यास रासायनिक कीटकनाशके आणि मजुरीचा खर्च कमी होतो. किडींची संख्या कमी असतानाच याद्वारे पिकाचे संभाव्य नुकसान टाळता येते. –

**वरुण देशमुख, उपसंचालक, कृषी, अमरावती.**

शेतकरी ते थेट ग्राहक
**कामधेनु नॅचरल्स**
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०




# भारताने तयार केली मलेरियावर पहिली लस

**दि.१६विदर्भ प्रजासत्ताक**

भारताने मलेरियाविरुद्धच्या लढाईत एक ऐतिहासिक टप्पा गाठला आहे. इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च ने देशात विकसित झालेल्या पहिल्या मलेरिया लसीला मान्यता दिली आहे. 'अ‍ॅडफाल्सिव्हॅक्स' नावाची ही लस एकाच वेळी मलेरियाच्या अनेक टप्प्यांवर काम करते आणि रुग्णाला तसेच इतरांना होणारा प्रसार थांबवते.

अ‍ॅडफाल्सिव्हॅक्स ही लस विशेषतः प्लास्मोडियम फाल्सीपेरम या घातक मलेरिया परजीवीपासून बचाव करण्यासाठी तयार करण्यात आली आहे. ही लस भुवनेश्वर येथील खउचठ च्या प्रादेशिक वैद्यकीय संशोधन केंद्रात विकसित करण्यात आली. तिचं वैशिष्ट्य असं की ती परजीवी रक्तात पोहोचण्याआधीच त्याला थांबवते. त्यामुळे रुग्णाचे संरक्षण तर होतेच, पण आजाराचा प्रसार इतरांमध्ये होण्याची शक्यता देखील कमी होते.

**ग्रामीण भागासाठी आशेचा किरण**

या लसीचं आणखी एक महत्त्वाचं वैशिष्ट्य म्हणजे तिची किंमत कमी असून ती मोठ्या प्रमाणात तयार करता येते. शिवाय ती ९ महिन्यांहून अधिक काळ रुम टेम्प्रेचरवर ठेवता येते. त्यामुळे दुर्गम आणि ग्रामीण भागातही ही लस सहज उपलब्ध होऊ शकते.

**उत्पादन कोण करणार?**

खउचठ ने या लसीचं उत्पादन करण्यासाठी ५ भारतीय कंपन्यांना परवाना दिला आहे –

– इंडियन इम्युनोलॉजिकल लिमिटेड

– टेकइन्व्हेन्शन लाईफकेअर प्रा. लि.

– पॅनाक्सिया बायोटेक लि.

– बायोलॉजिकल ई लि.

– झायडस लाईफसायन्सेस

मलेरिया निर्मूलनाचं भारताचं ध्येय

भारताने २०२७ पर्यंत नव्या मलेरिया रुग्णांची संख्या शून्यावर



आणण्याचं आणि २०३० पर्यंत हा आजार पूर्णपणे संपवण्याचं लक्ष्य ठेवलं आहे. मागील काही वर्षांत मोठी प्रगतीही झाली आहे –

२०१७ मध्ये मलेरियाचे सुमारे ६४ लाख रुग्ण होते, २०१३ मध्ये ही संख्या २० लाखांवर आली. मृत्यूंची संख्या २०१७ मध्ये ११,१०० वरून २०२३ मध्ये फक्त ३,५०० पर्यंत कमी झाली. २०२४ मध्ये भारताला थकज च्या उच्च भार असलेल्या देशांच्या यादीतून वगळण्यात आलं.

आव्हाने अजून शिल्लक

तरीही काही भागांमध्ये आव्हाने कायम आहेत. ओडिशा, छत्तीसगड, झारखंड आणि ईशान्य भारतातील काही राज्यांत मलेरियाचं प्रमाण अजूनही जास्त आहे. पावसाळ्यानंतर दिल्लीसारख्या शहरी भागातही रुग्णसंख्या वाढलेली दिसते.

**अ‍ॅडफाल्सिव्हॅक्स का महत्वाची?**

ही लस केवळ रुग्णाचं रक्षण करत नाही तर आजाराचा प्रसार रोखते. त्यामुळे भारताचं मलेरियामुक्त होण्याचं स्वप्न वेळेआधी पूर्ण होण्याची आशा निर्माण झाली आहे.

# लोकाभिमुख आणि पारदर्शक महसूल प्रशासनासाठी विभागात १७ सप्टेंबरपासून 'सेवा पंधरवडा'
## सेवा पंधरवडा व १५० दिवस कृती आराखड्यांतर्गत बिंदुनामावली तपासणी शिबिर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती,**

राज्य शासनाने प्रशासकीय विभागांसाठी १५० दिवसांचा आराखडा निश्चित केला आहे. महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम, गतिमान व पारदर्शक होण्यासाठी पंतप्रधान राष्ट्रनेता नरेंद्र मोदी यांचा जन्मदिन १७ सप्टेंबर ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती २ ऑक्टोबर या कालावधीत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत विभागात 'सेवा पंधरवडा' राबविण्यात येणार आहे. या पंधरवड्यात नागरिकांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ तसेच जिल्ह्यातील विकास प्रकल्प पूर्ण होण्याच्या दृष्टीने शासकीय यंत्रणांनी जाणीवपूर्वक प्रयत्न करावे, असे निर्देश विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल यांनी दिले.

विभागीय आयुक्त कार्यालयाच्या सभागृहात, विभागीय आयुक्त डॉ. सिंघल यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवारी (ता.१२ सप्टेंबर) सेवा पंधरवडा पूर्वतयारीबाबत आढावा बैठक घेण्यात आली, त्यावेळी त्या बोलत होत्या. या आढावा बैठकीत अपर आयुक्त अजय लहाने, सुरज वाघमारे, सहआयुक्त श्री. पाणबुडे, उपायुक्त संतोष कवडे, राजीव फडके, सहाय्यक आयुक्त तुकाराम टेकाडे, वैशाली पाथरे तसेच विभागातील पाचही जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दूरदृश्यप्रणालीच्या माध्यमातून यावेळी उपस्थित होते.

या आढावा बैठकीत विभागीय आयुक्त डॉ. सिंघल यांनी राज्य शासनाच्या 'सेवा पंधरवडा' राबविण्यामागची रुपरेषा स्पष्ट केली. त्या म्हणाल्या की, हा 'सेवा पंधरवडा' तीन टप्प्यात राबविण्यात येणार असून यामध्ये प्रामुख्याने पहिल्या टप्प्यात पाणंद रस्ते विषयक मोहीम, दुसऱ्या टप्प्यात 'सर्वांसाठी घरे' उपक्रम आणि तिसऱ्या टप्प्यात नावीन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात येणार आहे. या पंधरवड्यातील उपक्रम यापूर्वीपासून सुरू असले तरी या कालावधीत सदर उपक्रमांची युद्धपातळीवर मोहीम स्वरूपात अंमलबजावणी करावी. यात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान, जिवंत सातबारा मोहीम, मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान, विमुक्त जाती व भटक्या जमाती सवंर्गातील लाभार्थ्यांना ओळखपत्रे, प्रमाणपत्रे व विविध योजनांचा लाभ मिळवून देणे, हरित महाराष्ट्र वृक्ष लागवड मोहिम, संत सेवालाल महाराज तांडा समृद्धी योजना, लोकअदालत, धरती आबा अभियान आदी उपक्रम प्रभावीपणे राबवावेत, अशा सूचना विभागीय आयुक्तांनी केल्या.

विभागीय आयुक्त डॉ. सिंघल यांनी सांगितले की, शासन निर्णयानुसार सेवा पंधरवडा तीन टप्प्यांमध्ये राबविला जाणार आहे.



पहिला टप्पा – पाणंद रस्ते विषयक मोहिम असून दि.१७ ते २२ सप्टेंबर २०२५ या कालावधीत राबविला जाणार आहे. या कालावधीत ग्रामस्तरावरील रस्त्यांची यादी करणे, प्रपत्र१ व प्रपत्र २ मधील नोंदीनुसार अतिक्रमित रस्त्यांबाबत प्रस्ताव तयार करणे, ग्रामसभेत प्राथमिक यादी ठेवणे, भूमिअभिलेख विभागामार्फत सीमांकन, अतिक्रमित रस्त्यांवरील कायदेशीर कारवाई, पाणंद/शिवार रस्त्यांना क्रमांक देणे आणि त्यांचे गाव नकाशावर चिन्हांकन करणे, रस्त्यांच्या एकत्रित नोंदी, पाणंद रस्त्यांच्या दुतर्फा वृक्ष लागवड आदी कामे करण्यात यावीत.

दुसऱ्या टप्प्यात 'सर्वांसाठी घरे' उपक्रम दि. २३ ते २७ सप्टेंबर दरम्यान राबविण्यात येणार असून त्याअंतर्गत सर्वसामान्य नागरिकांना घर मिळावे, या उद्देशाने 'सर्वांसाठी घरे' या उपक्रमांतर्गत शासनाकडून निर्गमित शासन निर्णयातील तरतूदींची अंमलबजावणी करणे, भूमिहिन व बेघर कुटुंबांना घरे बांधण्यासाठी जमिनींची उपलब्धता तपासून घरकुलांसाठी शासकीय जमिनी कब्जे हक्काने प्रदान करणे, शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे नियमांनुसार नियमानुकूल करणे, विकास आराखड्याशी सुसंगत जमिनींवरील गायरान नोंदी कमी करणे, सुसंगत नसलेल्या जमिनींसाठी आरक्षण बदल प्रस्ताव सादर करणे, तसेच पात्र लाभार्थ्यांना शासकीय जमिनींचे पट्टे वाटप करणे, रहिवासी प्रयोजनासाठी मंजूर जमिनींचे पट्टे वाटप करणे, खाजगी मिळकतधारक व अतिक्रमण नियमानुकूल केलेल्या मिळकतधारकांना पट्टे देणे आदी कामे पूर्ण करण्यात यावीत, असेही विभागीय आयुक्तांनी यावेळी सांगितले.

तिसऱ्या टप्प्यात स्थानिक परिस्थितीचा विचार करुन नावीन्यपूर्ण उपक्रम दि. २८ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर दरम्यान राबविण्यात यावा. या कालावधीत स्थानिक गरजा व भौगोलिक परिस्थिती लक्षात घेऊन नावीन्यपूर्ण उपक्रम राबवावेत, अशा सूचना विभागीय आयुक्तांनी यावेळी दिल्या. नाविण्यपूर्ण उपक्रमांतर्गत आदिसेतू, महाराजस्व अभियान विभागातील पाचही जिल्ह्यांत आयोजित करण्यात येणार आहेत. आदिसेतू उपक्रमांतर्गत विभागीय आयुक्त स्वतः जिल्ह्यातील गावांना भेटी देऊन तेथील विकासप्रकल्पांची पाहणी करणार आहेत, अशी माहिती आढावा बैठकीत देण्यात आली.

**महसूल पंधरवडा व १५० दिवस कृती आराखड्यांतर्गत विभागात बिंदुनामावली तपासणी शिबिर–** महसूल पंधरवडा व १५० दिवस कृती आराखड्यांतर्गत विभागातील पाचही जिल्ह्यांत प्रशासकीय विभागांची बिंदुनामावली तपासणी शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे. या शिबिरात महसूल, जिल्हा परिषद, नगर परिषद, राज्य परिवहन व अन्य शासकीय विभागांच्या सर्व संवर्गाच्या बिंदुनामावली तपासून अद्यायावतीकरण करण्यात येणार आहे. विभागीय आयुक्त कार्यालयाच्या मागासवर्गीय कक्षाव्दारे हा उपक्रम राबविला जात असून दि. १६ सप्टेंबर रोजी, सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी अकोला येथील नियोजन भवन येथे पहिले शिबिर होणार आहे. याची सर्व संबंधित आस्थापना प्रमुखांनी नोंद घ्यावी. या शिबिराचा लाभ घेण्यासाठी जिल्ह्यातील सर्व आस्थापनांनी बिंदुनामावली रजिस्टर व आवश्यक दस्ताऐवजांसह उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले. बिंदुनामावली संदर्भातील माहिती पुस्तिका (चेकलिस्ट) र्हींींि:// रीरींरींळवर्ळींळीळप.र्सीं.ळप या विभागीय आयुक्त कार्यालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली आहे, अशी माहिती बैठकीत देण्यात आली.

# उद्यापासून अमरावती मध्ये स्वस्थ नारी, सशक्त परिवार अभियान
## स्त्रीशक्तीला आरोग्यशक्तीची साथ, ठरणार विकसित भारताचा आधार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती**

महिलांचे आरोग्य आणि सक्षमीकरण हे कुटुंब, समाज आणि देशाच्या प्रगतीचे प्रमुख केंद्रस्थान आहे. त्याच ध्येयाने आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयामार्फत स्वस्थ नारी, सशक्त परिवार हे विशेष राष्ट्रीय अभियान १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२५ दरम्यान संपूर्ण अमरावती महानगरपालिका कार्यक्षेत्रात राबविण्यात येणार आहे.

या अभियानात महिलांसाठी आणि मुलांसाठी आरोग्य तपासणी शिबिरे, जनजागृती कार्यक्रम तसेच विविध आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

**अभियानाचे मुख्य उद्दिष्ट–** ग्रामीण व शहरी भागांमध्ये महिलांसाठी आणि मुलांसाठी तपासणी व विशेषज्ञ आरोग्य शिबिरे आयोजित करून आरोग्यसेवा प्रत्येकापर्यंत पोहोचविणे हे यामागचे ध्येय आहे.

**कुठे मिळणार सेवा?–** आयुष्मान आरोग्य मंदिरांमध्ये (AAM-SHC) दररोज तपासणी व जनजागृती शिबिरे

ग्रामीण रुग्णालये/उपजिल्हा रुग्णालये (उक्डी) व प्राथमिक आरोग्य केंद्रे (झक्ड/णझक्ड) येथे विशेषज्ञ तपासणी

खाजगी महात्मा फुले जनआरोग्य योजना संलग्न रुग्णालये व क्लिनिकमध्ये आरोग्य शिबिरे

महिलांसाठी आरोग्य तपासणी

उच्च रक्तदाब व मधुमेह तपासणी

तोंड, स्तन व गर्भाशय मुखाचा कर्करोग निदान

**क्षयरोग (ढइ) तपासणी**

किशोरवयीन मुली व महिलांसाठी निमिया तपासणी व समुपदेशन

आदिवासी महिलांसाठी सिकल सेल तपासणी कार्ड वाटप व समुपदेशन

माता व बाल आरोग्य सेवा

गर्भवतींसाठी –छड तपासणी, हिमोग्लोबिन तपासणी व पोषण




मार्गदर्शन

बालकांचे आवश्यक लसीकरण

**आयुष सेवा**

आयुर्वेद, होमिओपॅथी, युनानी, सिद्ध व नॅचरोपॅथी पद्धतींवर आधारित उपचार सुविधा

**जनजागृती व वर्तणूक बदल संवाद**

किशोरवयीन मुलींसाठी मासिक पाळी स्वच्छता व पोषण सत्रे

महिला बचत गट व पंचायत प्रतिनिधींमार्फत तेल-साखरेचा वापर कमी करण्याचे समुपदेशन

पोषण व निरोगी जीवनशैलीविषयी मार्गदर्शन

**रक्तदान शिबीरे**

१ ऑक्टोबर राष्ट्रीय स्वेच्छा रक्तदान दिनानिमित्त १ लाख युनिट रक्त संकलनाचे ध्येय ठेवले आहे.

इंडियन रेड क्रॉस सोसायटी, अखिल भारतीय तेरापंथ युवक परिषद आदी संस्थांच्या माध्यमातून आयोजन रक्तदान प्रतिज्ञा व नोंदणी सुविधा उपलब्ध.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाथा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब – पोर्टल /ई – पेपर

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

Scan this QR code using the WhatsApp camera to join this group
क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

मंगळवार दि. १६ सप्टेंबर २०२५ शहर/ग्रामिण

## प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या जन्मदिनी

# ७५ दिव्यांनी उजळणार अंबा-एकविरा देवीचे मंदिर

## सकाळच्या प्रहरात होणार 'महाआरती'

### खा. डॉ. अनिल बोंडे सपत्नीक करणार महापूजा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६अमरावती :** प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा बुधवारी (ता.१७सप्टेंबर) रोजी ७५ वा वाढदिवस आहे. या ऐतिहासिक दिनाचे अवचित साधत भाजपच्या किसान मोर्चाचे राष्ट्रीय महामंत्री, महाराष्ट्राचे माजी कृषी मंत्री तथा राज्यसभेचे सदस्य डॉ. अनिल बोंडे हे अमरावतीकरांचं आराध्य दैवत असलेल्या कुलस्वामिनी अंबादेवी व एकवीरा देवी मंदिरात सपत्नीक ७५ दिवे लावणार आहेत. सकाळीच आंबा एकवीरा देवीची आराधना करत ७.३० वाजता महाआरतीच देखील आयोजन करण्यात आलं आहे. या उपक्रमात अमरावतीकर नागरिकांनी मोठ्यासंख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी केले आहे.





प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी २०१४ मध्ये भारताच्या प्रधानमंत्री पदाची सूत्र स्वीकारल्यावर ऐतिहासिक आणि तितकेच जागतिक नेतृत्वाचा परिचय देणारे धाडसी निर्णय घेतले. आंतरराष्ट्रीययोग दिवस जगात साजरा करण्याचा निर्णय हे यातील महत्त्वाचे पाऊल होतं. वसुधैव कुटुम्बकम हा नारा देत जगाच लक्ष भारताच्या दिशेने वेधून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी जी-२० परिषदेचे अध्यक्ष पद देखील भूषवलं, ही बाब भारताच्या कर्तबगारीचा परिचय देणारी होती. याविषयी माहिती देताना खासदार डॉ. अनिल बोंडे म्हणाले, स्वच्छ भारत अभियान, मेक इन इंडिया, डिजिटल इंडिया, प्रधानमंत्री जनधन योजना, उज्वला योजना, स्टार्ट अप इंडिया, आयुष्यमान भारत योजना, घरकुल योजना, आत्मनिर्भर भारत, शेतकऱ्यांसाठी किसान सन्मान योजना, कोविड महामारीत जगभरात अडकलेल्या - भारतीयांना सुखरूप बाहेर काढण्यासाठी मिशन वंदे भारत इत्यादी अभियान राबवून भारताने जागतिक स्तरावर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाचा परिचय दिला. यासह भारताने विज्ञान-तंत्रज्ञान क्षेत्रातही ऐतिहासिक कामगिरी केली आहे. अंतरिक्ष क्षेत्रातही आपला परिचय देत मिशन चंद्रयान ३, मिशन गगन यान इत्यादी मोहिमा यशस्वीपणे हाताळल्या. देशातील नागरिकांच्या मनात राष्ट्रभक्तीचाच स्फुलिग चेतवण्यासाठी 'मेरी माटी मेरा देश', हर घर तिरंगा अभियान राबवून जगाचं लक्ष भारताच्या दिशेने वेधून घेतलं. भारत आज वैश्विक महासत्ता होण्याच्या दिशेने वाटचाल करत असताना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना उत्तम निरोगी दीर्घायुष्य लाभण्यासाठी खासदार डॉ. अनिल बोंडे, डॉ. वसुधा बोंडे यांच्या पुढाकारातून अमरावतीच आराध्य दैवत असलेल्या अंबा एकविरा मातेच्या मंदिरात १७सप्टेंबरला सकाळी ७.३० वाजता प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त ७५ दिवे लावले जाणार आहेत. दरम्यान महाआरती केली जाणार आहे. या ऐतिहासिक क्षणाच साक्षीदार होण्यासाठी प्रत्येक अंबानगरी वासियांनी या कार्यक्रमाला उपस्थित राहावे, असे आवाहन खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी केले आहे.

## नवरात्री यात्रेची मनपा प्रशासनाकडून तयारी सुरु

# १४७ दुकाने व ९ स्वागत गेट उभारण्यात येणार

### स्वागत गेटचा होणार लिलाव

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६ अमरावती –** सोमवार २२ सप्टेंबरपासून अंबादेवी आणि एकविरा देवी नवरात्री उत्सवाचा शुभारंभ होत आहे. यानिमित्त ९ दिवस राजकमल चौक ते गांधी चौक रोडच्या दुतर्फा मोठी यात्रा भरते. देवींच्या दर्शनासाठी अमरावती शहरातूनच नव्हे तर जिल्ह्यातून तसेच राज्यभरातून भाविक दरवर्षी येतात. त्यामुळे या यात्रेत रोडच्या दुतर्फा दुकाने सजतात. यावर्षी यात्रेत ५ बाय ७ फुट आकाराचे १४७ दुकान लावण्यात येणार आहेत. सोबतच ९ १९ स्वागत कमानी उभारण्यात येणार आहे. याबाबतचे रेट शुक्रवार १९ सप्टेंबर मनपा आयुक्त सौम्या शर्मा व अतिरीक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपायुक्त मेघना वासनकर यांच्या मार्गदर्शनात फायनल ठरविण्यात येणार आहे. दरवर्षी यात्रेत रोडच्या दुतर्फा दुकानासाठी प्लॉट उपलब्ध करून देण्यात येते. यामधून मनपाला १३.५० लाखांचे उत्पन्न प्राप्त झाले होते. यावर्षी १४७ दुकानांची व्यवस्था करण्यात आली असून दरामध्ये सुद्धा ६२९६ रुपयांवरून १० टक्के वाढ म्हणजे ७२९६ रुपयांपर्यंत जाण्याची शक्यता आहे. सोबतच उभारण्यात येणाऱ्या स्वागत कमानी प्रथमच लिलाव करून देण्यात येणार आहे.

**५६ दुकाने आरक्षित –** विशेष म्हणजे मार्केट समोरिल दुकान त्याच दुकानदारासाठी राखीव ठेवले आहे. या दुकानाची बोली ९५८३ व १८ टक्के असे मिळून ११३०८ रु. भाडे ठेवण्यात आले. असे एकूण ५६ दुकाने राखिव असून साधारणतः यातून मनपाला ६ लाख ३३ हजार २४८ रुपये उत्पन्न प्राप्त होईल. तर ९१ दुकान खुला लिलाव होईल. यातून मनपाला ६ लाख ६३ हजार ९३६ रुपये उत्पन्न प्राप्त होईल.

**एकूण ९ स्वागत गेट उभारणार –** राजकमल ते गांधी चौक दरम्यान यावर्षी ९ कमानी उभारण्यात येणार आहे. यावर्षी स्वागत कमानीचे लिलाव होणार असल्याची माहिती आहे.



**१९ स्पटें. ला दुकाने व गेटचे रेट ठरणार**

दरम्यान यात्रेतील १४७ दुकाने आणि ५ फुट रुंद आणि २० -फुट उंच असलेल्या गेटचे रेट सोमवारला आयुक्तांसोबत होणाऱ्या बैठकीत ठरणार आहेत. यावर्षी गेटचे रेट साधारणतः २८ हजार रुपये ठरणार आहे. अधिक बोली लावणाऱ्यांना पहिले मनषाचे गेट सोडून गेट नं. २ ते गेट नं. ९ पर्यंत प्राधान्याने देण्यात येणार आहे. अर्जाची किंमत ५९० रुपये ठेवण्यात आली आहे. तसेच ५००० रुपयांचा डीडी द्यावा लागणार आहे. सविस्तर माहितीसह विहीत नमुन्यातील निविदा प्रपत्र तसेच अटी व शर्ती रु.५००/- + १८% जीएसटी रोखीने भरुन १५ ते १८ सप्टेंबप २०२५ पर्यंत दुपारी १२.३० वाजेपर्यंत कोटेशन फॉर्म प्राप्त करता येईल. सिलबंद कोटेशन १८ सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी ६.०० वाजेपर्यंत बाजार व परवाना विभाग या कार्यालयात दाखल करता येईल. तसेच १९ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता मा.उपायुक्त (प्रशा.) यांचे कार्यालयात उपस्थितांसमोर उघडण्यात येईल. या संबंधीत अटी व शर्ती बाजार व परवाना विभाग, राजापेठ, महानगरपालिका हॉटेल, ग्रेस इन मागे, झोन क्र.२ पहिला माळा, अमरावती या कार्यालयात पाहावयास मिळतील किवा महानगरपालिकेचे संकेत स्थळावर Xhttps://www.amravaticorporation.inवर माहिती उपलब्ध राहतील.

# देशमुख लॉन ते रहाटगाव रस्ता खड्ड्यांनी भरलेला

### तीन दिवसांत दुरुस्ती न झाल्यास 'बेशरम आंदोलन'

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६अमरावती–** शेगाव - रहाटगाव रस्ता, विशेषतः देशमुख लॉन ते रहाटगाव पेट्रोल पंप आणि माइलस्टोन रेस्टॉरंटपर्यंतचा मार्ग अक्षरशः चाळण झाली असून संपूर्ण रस्ता खड्ड्यांनी भरलेला आहे. या मार्गावरून रोज हजारो नागरिकांची ये-जा असते, परंतु रस्त्याची दुरवस्था लक्षात घेता, रहिवाशांनी आता तीव्र संताप व्यक्त केला आहे.



स्थानिकांनी महानगरपालिका आणि बांधकाम विभागाला यासंदर्भात अनेक वेळा लेखी आणि तोंडी तक्रारी करूनही अजूनपर्यंत कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आलेली नाही. परिणामी, अपघातांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असून अनेक नागरिक जखमी झाले आहेत.

या रस्त्याशी सुमारे ५० हून अधिक वसाहती जोडलेल्या असून, संपूर्ण जिल्ह्याच्या पाच तालुक्यांमधील नागरिक याचा वापर करतात. तरीदेखील पालिकेच्या दुर्लक्षामुळे आज रस्त्याची अवस्था अत्यंत बिकट झाली आहे.

स्थानिक नागरिकांनी इशारा दिला आहे की, पुढील तीन दिवसांत जर रस्त्याचे डागडुजी व डांबरीकरणाचे काम सुरु झाले नाही, तर रस्त्यावरील खड्ड्यांमध्ये 'बेशरम' झाडे लावून निषेध नोंदवला जाईल. या अनोख्या आंदोलनासाठी नागरिक सज्ज झाले असून, यामुळे कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न उद्भवल्यास त्यास जबाबदार फक्त महानगरपालिका प्रशासन व बांधकाम विभाग असेल, असे स्पष्ट करण्यात आले आहे.दरम्यान, स्थानिक नागरिकांनी प्रशासनाला लवकरात लवकर जागे होण्याचे आवाहन केले असून, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा दिला आहे.

# मुंबई-अमरावती फ्लाईट हवेतूनच मुंबई रिटर्न...!

## ढगाळ वातावरण व अंधारामुळे उड्डाण रद्द

### बेलोरा विमानतळावर प्रवासी आकाशाकडे पाहतच उभे

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६अमरावती,** काळेकुट्ट ढग, संपूर्ण अंधार, विजांच्या कडकडाट अर्थात खराब हवामानामुळे सोमवार, १५ सप्टेंबर रोजी बेलोरा विमानतळावर मुंबईहून येणारे विमान हवेतूनच परत मुंबईला रवाना झाले. त्यामुळे अमरावतीला येणारे प्रवासी पुन्हा मुंबईला गेले तर अमरावतीवरून मुंबईला जाणारे प्रवासी आकाशाकडे पाहतच राहिले.



उल्लेखनीय असे की, सोमवार, १५ सप्टेंबर रोजी केवळ खराब हवामानामुळे बेलोरा विमानतळावर विमान उतरवण्यात आले नाही. मुंबईहून येणारे विमान आकाशात फिरून मुंबईला रवाना झाले. तर मुंबईतील हवामान अमरावतीपेक्षाही वाईट होते.सोमवार, १५ सप्टेंबर रोजी अमरावती शहर आणि जवळच्या जिल्ह्यांतील लोकही मुंबईतील विमानात चढण्यासाठी वेळेवर बेलोरा विमानतळावर पोहोचले. अचानक संध्याकाळी ५ वाजता हवामान बिघडू लागले आणि मेघगर्जनेसह पाऊस सुरू झाला. खराब हवामानामुळे एटीसीने मुंबई - अमरावती विमानाला उतरू दिले नाही.दुसरीकडे, रात्रीच्या लैंडिंगची सुविधा नसल्याने ही परवानगी देण्यात आली नसल्याचा अंदाज आहे. कारण त्यावेळी आकाशात काळे ढग होते आणि बेलोरा विमानतळावर संध्याकाळइतका अंधार होता. अशा परिस्थितीत, असा अंदाज आहे की या कारणास्तवः विमानाला एटीसीकडून उतरण्याची परवानगी मिळाली नाही.प्रवासी आकाशाकडे पाहतच राहिलेअन विमान निघून गेले. यादरम्यान, मुंबईला जाणारे प्रवासी आकाशाकडे पाहत उभे राहिले आणि विमान कधीतरी उतरेल याची वाट पाहत राहिले. परंतु विमान शेवटपर्यंत बेलोरा विमानतळावर उतरले नाही आणि अमरावतीला येणाऱ्या प्रवाशांना परत मुंबईला घेऊन गेले. हे विमानही संध्याकाळी ६:५६ वाजता मुंबईत पोहोचले.

#### बेलोरा विमानतळ एक तमाशा

अमरावतीचे बेलोरा विमानतळ सुरू झाल्यापासून आतापर्यंत विमान कंपन्या आणिविमानतळप्रशासनाला या विमानतळावरून एकही उड्डाण चालवण्यास त्रास होत आहे. कधीकधी १५-१५ दिवसांसाठी उड्डाण रद्द केले जाते तर कधीकधी इंधन टैंकर चिखलात अडकल्याने उड्डाण रद्द केले जाते. आता खराब हवामानामुळेविमान अजिबात उतरले नाही.

# इन्कम टॅक्स पोर्टल गडगडले, शेवटच्या दिवशी करदात्यांचे टेन्शन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६अमरावती –** सेंट्रल बोर्ड ऑफ डायरेक्ट टॅक्सेस विभागानं आयटीआर फाईल करण्यासाठी दिलेली तारीख १५ सप्टेंबर म्हणजेच सोमवारला संपलीय. शेवटचा दिवस असल्यानं करदाते मोठ्या प्रमाणात आयटीआर फाईल करत असल्यानं इन्कम टॅक्सविभागाची आयटीआरफायलिंगच्या वेबसाईटचा वेग मंदावला होता. त्यामुळे अनेक करदात्यांचे टेन्शन वाढले आणि हिरमोड झाला.इन्कम टॅक्स विभागानं आयटीआर फॉर्म आणि टीडीएस रिफ्लेक्शनसाठी होणारा विलंब टाळण्यासाठी दुरुस्त्या केल्या होत्या. त्यामुळं यंदा ३१ जुलैवरुन मुदत वाढवून १५ सप्टेंबर करण्याचानिर्णयघेण्यात आला होता. गेल्या काहीदिवसांपासून आयटीआर फाईल करणाऱ्या अनेकांना अडचणींचा सामना करावा लागत असल्याच्या तक्रारी समोर आल्या होत्या. लॉगीन फेल होणे, ॲकनॉलेजमेंट विलंबानं मिळणे किवा एरर मेसेज येणे, असे प्रकार घडत होते. आज आयटीआर फाईल करण्याच्या शेवटच्या दिवशी लॉगीन पेज लोड होण्यात उशीर होत असल्याचं निर्दशनास आलं.गेल्या वर्षी ३१ जुलै २०२४ पर्यंत ७.२८ कोटी करदात्यांनी आयटीआर फाईल केले होते. १३ सप्टेंबरला आयकरविभागानं जारी केलेल्या माहितीनुसार ६ कोटींपेक्षा अधिक करदात्यांनी आयटी आर फाईल केला होता. आयटीआर फाईल करण्यास १५ सप्टेंबरपर्यंत मुदत दिल्यानं यंदा आयटीआर फाईल करणाऱ्यांची संख्या वाढेल, असं अपेक्षित होतं. आयकर विभागानं दिलेल्या वेळेनंतर आयटीआर फाईल करण्यासाठी दंड भरावा लागतो. ज्या करदात्यांचं उत्पन्न ५ लाखांपेक्षा कमी असेल त्यांना १००० रुपये दंड द्यावा लागतो. तर, ५ लाखांपेक्षा अधिक उत्पन्न असलेल्यांना ५००० रुपयेदंड द्यावा लागतो.

#### मुदतवाढ नाही




इन्कमटॅक्सविभागानं आज सकाळी एक पोस्ट केली आहे. ज्यामुळं आर्थिक वर्ष २०२४-२५ म्हणजेच असेसमेंट इयर २०२५-२६ साठी आयटीआर भरण्याची तारीख १५ सप्टेंबर असल्याचं स्पष्ट केलं आहे. मुदतवाढमिळणार नसल्याचंत्यांनी सांगितलं. याशिवाय इन्कम टॅक्स विभागानं आयटीआर फालिग मुदतवाढीसंदर्भातील पोस्ट फेक असल्याचं देखील सांगितलं आहे.

# शिक्षक मतदारसंघ निवडणुकीत अपात्र नावे समाविष्ट होऊ नयेत : युवक काँग्रेसची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६अमरावती –** महाराष्ट्र युवक काँग्रेसतर्फे समीर जवंजाळ यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी तथा निवडणूक अधिकारी, अमरावती विभाग यांना निवेदन देण्यात आले. विधान परिषदेच्या २०२६ च्या द्विवार्षिक निवडणुकांसाठी शिक्षक मतदारसंघाची नवी मतदार यादी तयार होत असताना अपात्र व्यक्तींचा समावेश होऊ नये, अशी मागणी या निवेदनात करण्यात आली.



भारत निर्वाचन आयोगाने १ नोव्हेंबर २०२५ हा अर्हता दिनांक निश्चित करून ११ नोव्हेंबरपासून मतदार यादी तयार करण्याची प्रक्रिया सुरू होणार असल्याचे कळविले आहे. या पार्श्वभूमीवर युवक काँग्रेसने काही महत्त्वाच्या सूचना केल्या आहेत. त्यानुसार, केवळ मान्यताप्राप्त शाळा-महाविद्यालयांतील किमान तीन वर्षांची सेवा असलेले शिक्षकच पात्र ठरावेत, अशी अट स्पष्ट करण्यात यावी.समीर जवंजाळ यांनी सांगितले की, अमरावती शिक्षक मतदारसंघाच्या २०२० च्या निवडणुकीत झालेली फेक नोंदणी ही अत्यंत चिंताजनक बाब होती. कॉन्व्हेंट शाळांतील शिक्षक, प्राथमिक शाळांतील शिक्षक, मान्यता नसलेल्या विनाअनुदानित शाळांतील कर्मचारी तसेच क्लार्क, प्रयोगशाळा परिचर यांसारख्या गैर-अध्यापन कर्मचाऱ्यांची नावेही यादीत समाविष्ट करण्यात आली होती. या सर्व प्रकारामागे काही शैक्षणिक संस्थांचे मालक व उद्योगपतींचा स्वार्थी हस्तक्षेप असल्याचे आरोप झाले. परिणामी खरे शिक्षक दुय्यम ठरले आणि शिक्षक मतदारसंघाच्या स्थापनेमागचा मूळ उद्देश कोलमडून पडला.त्यामुळे २०२६ च्या मतदार यादीत कोणतीही फेक नोंदणी होऊ नये, यासाठी काटेकोर पडताळणी करण्यात यावी, अशी मागणी युवक काँग्रेसने केली आहे. निवेदन देताना समीर जवंजाळ यांच्यासह वैभव देशमुख, अक्षय साबळे, कार्तिक देशमुख, सागर कलाने, आशिष यादव, चैतन्य गायकवाड, शुभम बांबल, संकेत भेंडे, कुणाल गावंडे आणि आकाश धुरटकर उपस्थित होते.

## पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ मेडिकल सायन्सेस मध्ये आयुर्वेदीय दिनचर्या पथनाट्याद्वारे जनजागृती

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६अमरावती–** पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ मेडिकल सायन्सेस येथे आयुर्वेद डे सप्ताह उत्सवात आयोजित होत आहे यात विद्यार्थ्यांचा मोठा सहभाग दिसून येत आहे. महाविद्यालयाचे प्रा. डॉ. श्यामसुंदर भूतडा आणि शैक्षणिक अधिष्ठाता डॉ. रणजीत देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली पथ नाट्य हा उपक्रम घेण्यात आला यात समाजात आयुर्वेदीय दिनचर्या बाबत जनजागृती करणे हा प्रमुख उद्देश होत . प्राचार्यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. स्वाती धामणीकर, डॉ. मनोदय मोहोड, डॉ. अनिकेत राऊत, डॉ. प्रियंका राऊत, डॉ. भैरवी देशमुख, डॉ. भारती बिरे, डॉ. ओवी शिंदे, डॉ. मेघा गौरखेडे, श्रीमती नीलिमा जैन, आदींनी परिश्रम घेतले.



डॉ. अंकिता कोरडे यांनी आयोजक म्हणून काम केले. पथ नाट्य हा उपक्रम घेण्यात आला या पथनाट्यामधुन आयुर्वेदीय दिनचर्या याचे आजच्या धकाधकीच्या जीवनात काय महत्व आहे आणि शरीर व मन हे दिनचर्येचे पालन केल्याने कसे निरोगी राहण्यास मदत होते हे नाट्याद्वारे प्रदर्शित करण्यात आले-

# अंजनगाव सुर्जी येथील घरफोडीत बुलढाण्याच्या कुख्यात शकील डॉन टोळीच्या घरफोड्यास अटक

## अंजनगाव पोलिसांची यशस्वी कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१६अंजनगाव सुर्जी** गेल्या दोन महिन्यांपासून बुलढाण्यातील कुख्यात घरफोडी करणारी टोळी तालुक्यात सक्रिय होती. टोळी कडून दिवसाढवळ्या बंद घरांना लक्ष्य करून घरफोड्या केल्या जात होत्या टोळीने अनेक चोऱ्या केल्या असल्याने गुप्त माहीतीच्या आधारे अंजनगाव पोलीस स्टेशन अधीकार्य़ांनी शहरातील घरफोडीत सक्रीय असनारा बुलढाण्यातील एका कुख्यात घरफोड्यास अटक केली आहे.९ सप्टेंबर ला भर दिवसा सकाळी ११ वाजता. अंजनगाव शहरातील आशा नगर स्वप्ननगरी येथील दोन बंद घरांमधून रोख रक्कम आणि सोन्याचे दागिने चोरीला गेले. महिलेच्या तक्रारीवरून अज्ञात चोरट्या विरुद्ध कलम ३०५,३३१(१) बीएनएस अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला, ज्याची गंभीर दखल




अंजनगाव पोलिसांनी घेतली आणि तपास सुरू केला. गुप्त माहितीच्या आधारे अंजनगाव पोलिस आणि जिल्हा ग्रामीण गुन्हे शाखा बुलढाणा येथे पोहोचल्यानंतर शकील डॉन टोळीचा कुख्यात घरफोडी करणारा शेख अहमद शेख समद, ( ३६ वर्ष) याला अटक करण्यात यश आले असुन टोळीचा मुख्य सूत्रधार शकील डॉन फरार आहे, ज्याचा अंजनगाव पोलिस सक्रियपणे शोध घेत आहेत. न्यायालयाने आरोपींला १६ सप्टेंबरपर्यंत पीसीआर दिला. सदर आरोपी मार्फत जिल्हाभरात केलेल्या चोऱ्या उघडकीस येण्याची शक्यता आहे. अंजनगाव पोलिसांच्या या यशाचे सर्वत्र कौतुक केले जात आहे. जिल्हा पोलिस अधीक्षक विशाल आनंद आणि उपविभागीय पोलिस अधिकारी मनीष ठाकरे, पोलिस अधिकारी सूरज बोंडे आणि उपपोलीस अधिकारी सूरज तेलगोटे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक भरत चिर्डे तपास करत आहेत.

विश्व हृदय दिनानिमित्त झेनिथ हॉस्पिटल व दुर्गा प्रकाश ट्रस्टतर्फे

# विशेष हृदय तपासणी शिबिराची सुरुवात



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१६अमरावती:** विश्व हृदय दिनानिमित्त जनजागृतीचा एक भाग म्हणून झेनिथ हॉस्पिटल व दुर्गा प्रकाश ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने विशेष हृदय सुरक्षा तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले आहे. हे शिबिर १६ ते ३० सप्टेंबर २०२५ दरम्यान झेनिथ हॉस्पिटल, वॉल्कट कंपाउंड, अमरावती येथे सुरू असून, नागरिकांना अत्यंत सवलतीच्या दरात विविध तपासण्या करून घेण्याची सुवर्णसंधी मिळणार आहे.

झेनिथ हॉस्पिटलचे इंटरव्हेन्शनल कार्डियोलॉजिस्ट डॉ. निरज राघानी यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येणाऱ्या या मोहिमेअंतर्गत खालील पॅकेजेस उपलब्ध आहेत:

**मूलभूत हृदय सुरक्षा पॅकेज –**

नियमित रु.३१५०, सवलतीत रु.११५० एडवांस हृदय सुरक्षा पॅकेज – नियमित रु.६३००, सवलतीत रु.२७०० विशेष हृदय सुरक्षा पॅकेज (२ऊ इको + अँजिओग्राफी) – नियमित रु.१३०००, सवलतीत रु.६५०० ही सेवा फक्त पहिल्या रु.१५० नोंदणीसाठी मर्यादित आहे. त्यामुळे नागरिकांनी वेळेत नोंदणी करून आपल्या व आपल्या कुटुंबाच्या हृदयाचे आरोग्य तपासून घ्यावे, असे आवाहन झेनिथ हॉस्पिटल च्या वतीने करण्यात आले आहे.

# ‘केशवा माधवा, तुझ्या नामात रे गोडवा’ -आमदार सुधीर मुनगंटीवार भजन गात तल्लीन; समाजमाध्यमात चर्चा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१६चंद्रपूर –** ‘केशवा माधवा तुझ्या नामात रे गोडवा’ हे भजन गात माजी मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार भजन मंडळीसोबत चांगलेच तल्लीन झाले होते. प्रसंग होता चंद्रपूर तालुक्यातील भजन मंडळांना भजन साहित्य वाटपाचा. तुकुम येथील अय्यप्पा मंदिर सभागृहात पार पडला. त्यावेळी आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी स्वतः भजन गाऊन सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

भजन हे केवळ भक्तिगीत नसून ते समाजात श्रद्धा, एकात्मता व अध्यात्म जागविणारे, समाजाच्या एकतेचे प्रेरणादायी माध्यम आहे, असे प्रतिपादन सुधीर मुनगंटीवार यांनी केले. विधानसभा निवडणुकीत दिलेल्या आश्वासनाची पूर्तता करत त्यांनी चंद्रपूर ग्रामीणमधील ३० भजन मंडळांना साहित्याचे वाटप केले.

कार्यक्रमाची सुरुवात मुनगंटीवार यांनी स्वतः ‘केशवा माधवा तुझ्या नामात रे गोडवा’ हे भजन गाऊन केली. आयोजकांच्या आग्रहावरून त्यांनी भजन सादर केले. कार्यक्रमाला जिल्हाध्यक्ष हरीश शर्मा, भाजप नेते रामपाल सिंग, श्रीनिवास जंगमवार, नामदेव आसुटकर, मनोज मानकर, शांताराम चौखे, फारुख शेख, गौतम निमगडे, चंद्रकांत धोडरे, देवानंद थोरात, रूद्रनारायण



तिवारी, नागेश कडूकर, अनितताई भोयर, रोशनी खान, केमा रायपुरे, वनिता आसुटकर, गीता वैद्य, गीता सिंग, अरविंद बोरकर, अमोल जगताप, अतूल पिल्लरवार, मुक्ता येरगुडे, सुरेखा थोरात, मोनी आसवानी, रंजना किन्नाके, दयानंद बंकुवाले, शंकर खत्री, घनश्याम यादव आदींची उपस्थिती होती.

आमदार मुनगंटीवार म्हणाले, ‘भजनामुळे धार्मिक व अध्यात्मिक भावनेने वातावरण भारावून जाते. भजनाला अध्यात्म्याची किनार असून ते प्रत्येक संकटावर मात करण्याची प्रेरणादायी ऊर्जा आहे. समाजात श्रद्धा, एकात्मता व अध्यात्म जागविण्याचे सामर्थ्य भजनामध्ये दडलेले आहे. हाच भक्तिभाव जोपासण्यासाठी भजन मंडळांना आवश्यक साहित्य समर्पित करीत आहे.’ भजन मंडळांना मिळालेल्या या साहित्यामुळे भक्ती सेवेला नवी ऊर्जा व प्रेरणा मिळेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

# गरब्यासाठी पोषाख, दागिन्यांची मागणी वाढली

## गरबाप्रेमींकडून ऑनलाइन खरेदीला प्राधान्य


### भाड्याने ड्रेस मिळण्याची सुविधा

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.१६अमरावती–**

नवरात्रोत्सवात तरुणाईत गरबा नृत्याचा उत्साह असून, घागरा-चोली, चुनरी, धोती-कुर्ता, टिपऱ्यांसह मल्टिऑक्सिडाईज दागिन्यांना पसंती वाढली आहे. ऑनलाइन खरेदीही होत आहेत. नवरात्रीनिमित्त बाजारपेठा सजल्याचे दिसते. दररोज वेगळा ड्रेस खरेदी करणे परवडत नसल्याने घागरा-चोली, केडीया भाड्याने घेत आहे. त्यावरील डिझाइननुसार त्याची किंमत ठरते या कपड्यांसह दागिनेही भाड्याने दिले जात असून, गतवर्षीच्या तुलनेत ३० टक्के मागणी वाढल्याचे विक्रेत्यांनी सांगितले आहे.

त्यात बाजूबंद, मांगटिका, कडा, झुमके, ब्रेसलेट, हारसेट, कमरबंध, बाजूबंद, बांगड्या, इअरिंगची रेंज आहे. ब्लॅक मेटलमध्ये मल्टिऑक्सिडाईज सेट तसेच आकर्षक ज्वेलरीची क्रेझ दांडियाप्रेमींमध्ये आहे. नवरात्रात गरबा खेळण्यासाठी वेगवेगळे ड्रेस घ्यावे लागतात. हे ड्रेस खरेदी करण्यासाठी पैसे जास्त लागतात. पैशांची बचत करण्यासाठी दांडिया, गरबा खेळण्यासाठी ड्रेस भाड्याने मिळण्याची सोय



अमरावतीत आहे. दरदिवशी ३०० ते ५०० रुपयांपर्यंत भाडे आहे. याशिवाय ज्वेलरीही भाड्याने मिळते. अनेकजण एक दिवस गरबा खेळण्यासाठी ड्रेस भाड्याने आणतात. नवरात्रीतील पेहरावावर घालण्यासाठी चांदीसह व ऑक्सिडाइज दागिन्यांची मागणी वाढली आहे. यामध्ये चांदीचे झुमके, रिंग, बिंदी, बांगड्या, हार, कमरपट्टा यासारख्या दागिन्यांना विशेष मागणी आहे. यासोबतच पेंटेड ज्वेलरीलाही मागणी आहे.

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत तालुकास्तरीय कार्यशाळा संपन्न

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१६ तिवसा–** ग्रामीण भागात स्थानिक स्वराज्य संस्था म्हणून प्रामुख्याने काम करणाऱ्या ग्रामपंचायतीस त्यांचे कामगिरीनुसार प्रोत्साहित करून त्यांची कार्यक्षमता वाढविण्या करिता तालुका ते राज्य असे चार स्तरांवर प्रोत्साहन देण्याकरिता या स्पर्धेत उत्कृष्ट काम करून सर्वोच्च पुरस्कार प्राप्त करण्याचे अभिवचन देण्यासाठी आणि आनुषंगिक क्षमता बांधणीच्या उद्देशाने तहसील कार्यालय तिवसाच्या सभागृहात दिनांक १५/०९/२०२५ रोजी तालुकास्तरीय कार्यशाळा पार पडली.सदर अभियानाचा कालावधी दिनांक १७ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर २०२५ आहे. अभियानाचे मुख्य सात घटक असून शंभर टक्के गुण प्राप्तीसाठी तालुक्यातील सर्वच ग्रामपंचायतीने सकारात्मक रित्या सहभाग नोंदविण्याचे आवाहन श्री अभिषेक कासोदे, गटविकास अधिकारी यांनी त्यांचे प्रास्ताविकातून केले.कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी श्री राजेशभाऊ वानखडे, आमदार, तिवसा हे आभासी पद्धतीने होते. प्रमुख अतिथी म्हणून श्रीमती छायाताई




दंडाळे, प्रदीपभाऊ गौरखेडे, डॉ. मयूर कळसे, तहसीलदार, श्री नारायण अमझरे , सहा. गटविकास अधिकारी तसेच डॉ. नितीन उंडे, गटशिक्षणाधिकारी हे प्रामुख्याने उपस्थित होते.या कार्यशाळेला तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतचे सरपंच, उपसरपंच, सर्व सदस्य, ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कर्मचारी तसेच सर्व विभागाचे विभाग प्रमुख विस्तार अधिकारी आणि पंचायत समितीचे सर्व कर्मचारी उपस्थित होते. कार्यशाळेच्या प्रथम सत्रामध्ये श्री. राहुल कांबळे, विस्तार अधिकारी आणि दुसऱ्या सत्रामध्ये श्री पांडुरंग उलेमाले, विस्तार अधिकारी यांनी तपशीलवार मार्गदर्शन केले.या कार्यशाळेचे संचालन श्री अजय अडीकने आणि श्री अतुल देशमुख यांनी केले. आभार प्रदर्शन श्री नारायण अमझरे, सहा. गटविकास अधिकारी यांनी केले.कार्यशाळेच्या यशस्वीततेसाठी पंचायत समिती तिवसा येथील सर्व अधिकारी आणि कर्मचारी यांनी मोलाचे सहकार्य केले–

# शहर बसमध्ये लोंबकळत करावा लागतो प्रवास

## अघटीत घडल्यास जबाबदार कोण?

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१६ अमरावती–** शहर बसमध्ये प्रवाशांना दाराच्या शेवटच्या पायरीवर उभे राहून प्रवास करावा लागत आहे. त्यामुळे कोणत्याही वेळी अघटीत घटना घडल्यास जबाबदारी कोण घेईल असा प्रश्न प्रवाशी करीत आहेत. विशेष म्हणजे शहर बसमध्ये तिकीट तपासणीस असलेली एक तरुणीच प्रवाशांना अशा प्रकारचा प्रवास करावयास भाग पाडत आहे.

शहरात सुरू असलेल्या शहर बसेसमधील नवसारी किंवा विद्यापीठात जाणा-या बसेस ह्या दररोज खचाखच भरून जातात. बसेसमध्ये सर्वसामान्य नागरिकांसह शासकीय कार्यालयांमधील कर्मचारी, शाळा, महाविद्यालयांमध्ये जाणा-या विद्यार्थी, विद्यार्थीनी मोठ्या संख्येने असतात. बसेसच्या मागील दाराच्या शेवटच्या पायरीपर्यंत प्रवाशी खचाखच भरलेले असतात. त्यामुळे बसमध्ये बसणारे प्रवाशी समोरील दारातून आंत चढण्याचा प्रयत्न करतात, मात्र तिकीट तपासणीस असलेली तरुणी समोरील दारातच उभी असते व ती



कोणालाही समोरील दारातून आत येवू न देता मागील दारातून जाण्यास भाग पाडते.

बसेसच्या मागील दाराच्या शेवटच्या पायरीपर्यंत आधीच प्रवाशी लोंबकळत प्रवास करीत असतांनाही ती तिकीट तपासणीस मात्र समोरील दारातून प्रवाशांना घेत नाही. अशावेळी नाईलाजास्तव नागरिकांना मागील दारातूनच उभे राहून प्रवास करावा लागतो. प्रवासादरम्यान कोणत्याही वेळी घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे जर अघटीत घडल्यास त्याला जबाबदार कोण असा प्रश्न सोमवारी अनेक प्रवाशी व्यक्त करीत होते. त्यातच त्या तिकीट तपासणीस युवतीने जो होता वह कर लो अशा शब्दात प्रवाशांना उत्तर दिल्यामुळे महापालिका प्रशासन तसेच शहर बसेसचे संचालन करणा-यांनी याकडे गांभिर्याने लक्ष देवून संबंधितांवर कारवाई करावी, अशी मागणी प्रवाशी करीत आहेत.

# वरुडचा जलवीर, कृष्णा आजनकरने जिल्हास्तरीय जलतरण स्पर्धेत गाजवला विजयाचा डंका

**विदर्भ प्रजासत्ताकदि.१६वरुड,**

मेहनत, जिद्द आणि आत्मविश्वास असेल तर कोणतेही यश दूर नसते याची प्रचिती स्व. मा. गां जागृत विद्यालय, वरूडचा विद्यार्थी कृष्णा हरिष आजनकर (वर्ग १० वी) याने जिल्हास्तरीय जलतरण स्पर्धेत सर्वांना दिली आहे.अमरावती येथील श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ आयोजित आंतरशालेय जिल्हास्तरीय जलतरण स्पर्धेत कृष्णाने आपल्या चपळतेने व प्रबळ जिद्दीने प्रभावी कामगिरी करत बटरफ्लाय १०० मीटरमध्ये सुवर्णपदक पटकावत पहीला क्रमांक,तर ब्रेस्ट स्ट्रोक २०० मीटरमध्ये रौप्यपदक पटकावत दुसरा क्रमांक



मिळवून दुहेरी यशाची कमान उंचावली. या दणदणीत यशामुळे विद्यालय, पालकवर्ग तसेच संपूर्ण वरुड शहर अभिमानाने उभे ठाकले आहे. पालक हरीश आजणकर मुलाचा गौरव करताना म्हणाले की, कृष्णाचा हा पराक्रम इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आहे. कठोर परिश्रमाने आपण कोणतेही स्वप्न पूर्ण करू शकतो.कृष्णानेही आपल्या यशाचे श्रेय आई-वडील, शिक्षक, मार्गदर्शक व सतत पाठिंबा देणाऱ्या मित्रांना दिले. त्याची जिद्द पाहता तो पुढे राज्य व राष्ट्रीय स्तरावर जलतरण क्षेत्रात वरुडचे नाव उज्ज्वल करेल, असा ठाम विश्वास सर्वत्र व्यक्त होत आहे.

# उद्याला श्रीमती नरसम्मा संस्थेत वर्धापन दिनानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन


**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६अमरावती** – श्रीमती नरसम्मा हिरय्या शैक्षणिक ट्रस्ट, किरण नगर, अमरावतीयेथील संस्थेच्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून संस्थेद्वारे विविध शैक्षणिक,सामाजिक, सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजनकरण्यात येते. यावर्षी सुद्धा दिनांक १७ सप्टेंबर, २०२५ रोजी संस्थेच्या वर्धापन दिनानिमित्त– गोंड राजघराण्याच्या महाराणी ज्यांनी विदेशी धार्मिक आक्रमणाविरुद्ध सशस्त्र लढादिला त्या राणी दुर्गावती व कर्नाटकतीलकोडंगल राज्याच्या – राणी अबक्का ज्यांनी विदेशी पोर्तुगीज आक्रमकांना पराभूत करूनस्वातंत्र्य राखले, अशा पराक्रमी वीरांगनांच्या ५०० व्याजयंतीनिमित्त, उद्या बुधवारी दुपारी ४.०० वाजता श्रीमतीनरसम्मा कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, किरण नगर,अमरावती येथे आयोजन केलेले आहे. या दोन्ही स्वातंत्र्य संग्रामामधील अकथित वीरांगनांचे प्रेरक चारित्र्यवरप्रकाश टाकण्यासाठी – इंदोर (मध्यप्रदेश) येथील प्रा. डॉ. रेखाताई नागर – प्रमुखवक्त्या म्हणून येणार आहेत. या वर्धापन दिनाच्या समारंभाचे प्रमुख अतिथी म्हणूनअमरावती मधील सुप्रसिद्ध हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या सचिव प्रा. डॉ.माधुरीताई चेंडके या भूषविणार आहेत. तसेच याप्रसंगी सामाजिक क्षेत्रात कार्यकरणाऱ्या नारी शक्तींचा सन्मान संस्थेद्वारे करण्यात येणार आहे.संस्थेच्या वर्धापन दिवसाचे औचित्य साधून महाविद्यालया मध्येदिनांक १७ आणि १८ सप्टेंबरला भारतीय ज्ञान प्रणाली (इंडियन नॉलेज सिस्टीम) च्याविषयावर राष्ट्रीय संमेलन आयोजित करण्यात आलेले आहे. भारतीय ज्ञान प्रणालीचेवैज्ञानिक, सांस्कृतिक एवंदार्शनिक आयाम या विषयावर प्रकाश टाकण्याकरिता – मुंबई, इंदोर व नागपूर येथून तज्ञ मार्गदर्शक या राष्ट्रीय संमेलनात उपस्थितीलावणार आहेत. तसेच या दोन्ही दिवशी फिलाटेलीक सोसायटी, अमरावतीयांच्या सहकार्याने महाविद्यालय परिसरात ऐतिहासिक डाक तिकिटांचे प्रदर्शन लावण्यातयेणार आहे.

# तक्षशिला अभियांत्रिकी महाविद्यालय, दारापुर येथे अभियंता दिन उत्साहात साजरा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१६अमरावती–** कर्तृत्व, दूरदृष्टी आणि शिस्त या तीन आधारस्तंभांवर उभी राहिलेली व्यक्तीमत्त्व म्हणजे भारतरत्न मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या. त्यांच्या जयंतीनिमित्त देशभरात साजरा होणारा अभियंता दिन हा केवळ जयंती सोहळा नसून अभियंत्यांच्या योगदानाची जाणीव करून देणारा प्रेरणादायी पर्व आहे. अशा महान अभियंत्यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी तक्षशिला अभियांत्रिकी व तांत्रिकी महाविद्यालय, दारापुर येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने अभियंता दिन मोठ्या उत्साहात आणि प्रेरणादायी वातावरणात साजरा करण्यात आला.

भारतात दरवर्षी १५ सप्टेंबर हा दिवस अभियंता दिन म्हणून साजरा केला जातो. हा दिवस भारताचे महान अभियंता भारतरत्न मोक्षगुंडम विश्वेश्वरैया यांचा जन्मदिवस आहे. ते भारतातील महान अभियंत्यांपैकी एक होते. त्यांनी अभियांत्रिकी क्षेत्रात असाधारण योगदान दिलं आहे. जे कोणीही विसरु शकत नाही. देशभरात बांधलेल्या अनेक नद्यांची धरणं आणि पूल यशस्वी करण्यात विश्वेश्वरय्या यांचा मोलाचा वाटा आहे. त्यांच्यामुळं



देशातील पाण्याचा प्रश्न मोठ्या प्रमाणात सुटला. १९६८ मध्ये डॉ. मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या जन्मतारखेला भारत सरकारनं ’अभियंता दिन’ म्हणून घोषित केलं. तेव्हापासून दरवर्षी १५ सप्टेंबर रोजी अभियंता दिन साजरा केला जातो.

कार्यक्रमाची सुरुवात भारतरत्न मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या प्रतिमेच्या पूजनाने व दीपप्रज्वलनाने झाली.या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून इंजिनिअर प्रदीप अंधारे ,कार्यकारी अभियंता, महावितरण, अचलपूर यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. त्यांनी आपल्या भाषणात अभियंता हा केवळ एक व्यवसाय नसून समाजाच्या विकासाचा पाया आहे, असे सांगितले. तंत्रज्ञान व नैतिकता यांचा समन्वय साधत विद्यार्थ्यांनी देशाच्या प्रगतीत योगदान द्यावे, असे आवाहनही त्यांनी केले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. टी. इंगोले उपस्थित होते.त्यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांना अभियंता दिनाचे महत्त्व पटवून देतांना सांगितले की, अभियंता हा केवळ यंत्रांचा निर्माता नसून तो समाज परिवर्तनाचा दीपस्तंभ आहे. विश्वेश्वरय्या यांनी प्रतिकूल परिस्थितीतही अथक परिश्रम,शिस्त आणि संयमाच्या जोरावर जागतिक स्तरावर भारताचे नाव उज्वल केले.

# सभेसाठी अक्षता वाटून शेतकरी शेतमजूर महिलांना निमंत्रण

## सातबारा कोरा, कर्जमाफीसाठी बेलोरा येथे गुरुवारी सभा



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६चां. बाजार**

राज्यातील शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करण्याचे आश्वासन देणाऱ्या महायुती सरकारला सत्तेत येऊन आता दहा महिने झाले आहे. मात्र अद्याप शेतकऱ्यांची कर्जमाफी झाली नाही. एकीकडे दुष्काळ, तर दुसरीकडे अतिवृष्टी अशा संकटात शेतकरी अडकला आहे. बळीराजाच्या जिवाशी खेळणाऱ्या सत्ताधाऱ्यांना जागे करण्यासाठी १८ सप्टेंबरला चांदूर बाजार तालुक्यातील बेलोरा येथे शेतकरी–शेतमजूर महिला सभेचे आयोजन केले आहे. या सभेला शेतकरी, शेतमजूर महिलांनी उपस्थित रहावे, असे आवाहन करून निमंत्रण देण्यासाठी महिला आपापल्या गावात घरोघरी जाऊन अक्षता वाटत आहेत. शेतकऱ्यांपाठोपाठ आता महिलांनी सुद्धा सरकारच्या धोरणाविरोधात भूमिका घेतली आहे.

या सभेत बच्चू कडूंसह अनेक शेतकरी नेते उपस्थित राहून सरकारला जाब विचारणार आहेत. शेतकऱ्यांचा हक्काचा सातबारा कोरा करण्यासाठी ही सभा निर्णायक ठरणार आहे.


सभेसाठी राकेश टिकेत, डॉ. अशोक ढवळे, विजय जावंधिया, महादेव जानकर, डॉ. अजित नवले, कैलास पाटील, राजन क्षीरसागर, विजू कृष्णन, युद्धवीर सिंग, तेजिंदरसिंग विर्क, किशोर ढमाले, विजय कुंभार, विठ्ठलराजे पवार, प्रशांत डिक्कर यांच्यासह देशभरातील शेतकरी संघटनांचे नेते –सामील होणार आहेत. प्रहारचे अध्यक्ष बच्चू – कडू यांनी शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी मागील काही महिन्यांपासून आक्रमक भूमिका घेतली आहे. सरसकट कर्जमुक्तीसाठी अमरावती येथे वाडा आंदोलन, रायगड येथे तीन दिवस अन्नत्याग आंदोलन, लोकप्रतिनिधींच्या घरासमोर टेंभा आंदोलन, मोझरीत ७ दिवस अन्नत्याग आंदोलन, त्यानंतर ७ दिवसांची डॉ. भाऊसाहेब देशमुख यांचे जन्मगाव पापळपासून ते साहेबराव करपे पाटील यांच्या चिलगव्हाण या गावापर्यंत सातबारा कोरा यात्रा, महाराष्ट्रात शेतकरी हक्क परिषद सुरू असून आता बेलोरा येथे शेतकरी, शेतमजूर महिलांचे संमेलन सभेच्या माध्यमातून ते पुन्हा सरकारला घेरणार आहेत.

# नवसारीतील ७००० मतदार मनपा प्रारूप प्रभाग रचनेत इकडून तिकडे

## आजवर प्रारूप प्रभाग रचनेबाबत नागरिकांनी नोंदवले १३२ आक्षेप

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६ अमरावती**

महापालिकेने निवडणुकीच्या अनुषंगाने घोषित केलेल्या प्रारूप प्रभाग रचनेत अनेक प्रभागांमध्ये बदले झाले असून, प्रभाग क्र. ३ नवसारी येथील ७ हजार मतदार प्रभाग क्र. ४ जमील कॉलनीत गेले आहेत. एवढ्या मोठ्या संख्येत मतदार इतर प्रभागात गेल्यामुळे माजी नगरसेवकांसाठी ही बाब फारच अडचणीची ठरणार आहेत. मोठ्या संख्येत हुकमी मतदारच जर इकडून तिकडे गेले असतील तर त्यामुळे येथील मतांचे समीकरण बिघडण्याची दाट शक्यता आहे. अशा अनेक त्रुटींमुळे प्रारूप प्रभाग रचनेबाबत सोमवार १६ पर्यंत १३२ आक्षेप व हरकती मनपाच्या निवडणूक



विभागाकडे आल्या आहेत. विलासनगर, जवाहर स्टेडियम, राजापेठ, कंवरनगर प्रभागांमध्ये ही मोठ्या प्रमाणात या बदल झाले आहेत. यासह अन्य प्रभागांमध्येही लहान–मोठे बदल झालेले दिसून येत आहेत. त्यामुळे मतांचे समीकरण निश्चितपणे बिघडणार आहे. ते बिघडू नये यासाठी माजी नगरसेवकांनी आक्षेप दाखल केले आहेत. या आक्षेपांबाबत फारकाही झाले नाही तर माजी नगरसेवकांसह इच्छुकांना आतापासूनच सर्व शक्यता गृहित धरून कामाला लागावे लागणार आहे. पारंपरिक प्रभागांमध्ये तोडफोड झाल्यामुळे तसेच मतदारांना इकडून तिकडे पाठवण्यात आल्याने काही दिग्गजांचे मताधिक्य घटण्याची दाट शक्यता आहे. तसेच इच्छुकांची तर झोप उडाली आहे.

परिसीमन तसेच काही प्रभागांमध्ये संपूर्ण एक परिसरच नव्याने जोडण्यात आल्यामुळे काही प्रस्थापित दिग्गजांना त्याचा फटका बसण्याची शक्यता आहे. कारण, नेहमीचे मतदार व परिसर जर प्रभागात नसेल तर त्याला उर्वरित किंवा नवीन मतदारांना आकर्षित करण्यासाठी आकाश पाताळ एक करावे लागेल.

जुन्या प्रभागात अनेक माजी नगरसेवकांनी विकासकामे केली. परंतु, त्यापैकी काही भाग आता इतर प्रभागात गेल्यामुळे त्यांना आतापासूनच उर्वरित प्रभागासाठी काही करता येईल काय, याचा विचार करून त्यानुसार रणनीती आखावी लागत आहे.

# तिवसा तालुक्यातील पशुधन / गोवंश धोक्यात

## तालुक्यातील शेतकऱ्यांच्या पशुधनाचे तातडीने लसीकरण करावे व शेतकऱ्यांना मार्गदर्शन; तालुका काँग्रेस कमिटीची मागणी



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६तिवसा**

गेल्या काही दिवसांपासून पुन्हा एकदा तिवसा तालुक्यातील गोवंश व पशुधनावर लंपी या संसर्गजन्य आजाराचे दुष्परिणाम जाणवत असून. अनेक गावांमधील शेतकऱ्यांच्या व बेवारस असलेल्या गोवंशावर या आजारामुळे चट्टे दिसून येत असून, वऱ्हा गणातील गाय, वासरू, व इतर पशुधनांच्या गळयामध्ये सुद्धा लंपीचा प्रादुर्भाव झालेला आहे.त्यामुळे आधीच अस्मानी संकटाने संकटात सापडलेल्या तालुक्यातील शेतकऱ्यांचे गोवंश सुद्धा संकटाच्या छायेत असून यामुळे दूध उत्पादन सुद्धा घटले आहे.* याकरिता आज तिवसा तालुका काँग्रेस कमिटीच्या पदाधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांसमवेत पशुधन विकास अधिकारी पशुसंवर्धन विभाग तिवसाडॉ. परीक्षित कातखेडे यांची भेट घेऊन यासंदर्भात वस्तुस्थिती मांडली. त्याचप्रमाणे गावातील पशुसंवर्धन विभागाशी निगडित असलेल्या सहकाऱ्यांना लंपीची लस कशा पद्धतीने परत देता येईल,लसीकरण मोहीम फिरत्या मोबाईल व्हॅन द्वारे घेणे सुरू करण्याबाबत मागणी, तातडीने लेखी आदेश काढण्याची मागणी यावेळी करण्यात आली.यासंदर्भात निवेदन देतेवेळी तालुका काँग्रेस कमिटी अध्यक्ष वैभव स. वानखडे, तालुका युवक काँग्रेस कार्याध्यक्ष जसबीर ठाकूर, सरपंच सूरज धूमनखेडे, उपसरपंच प्रशांत प्रधान, अंकुश निस्ताने, आशिष बायस्कर, ॲड विकास तुरकाने, विश्वजित बाखडे, आकाश मकेश्वर, तुषार लेवटे व शेतकरी उपस्थित होते.

# धामणगाव रेल्वे तालुक्यात ओला दुष्काळ जाहीर करा

## राष्ट्रवादी शरद पवार गटाची मागणी जिल्हाधिकाऱ्यांना दिले निवेदन



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६धा.रेल्वे**

धामणगाव रेल्वे तालुक्यात झालेल्या प्रचंड अतिवृष्टीमुळे शेतकरीवर्ग मोठ्या संकटात सापडला आहे. सततच्या पावसाने शेतीचे उत्पन्न होणार नाही, हे निश्चित झाले असून शेतकऱ्यांनी 'जगावं की मरावं हा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे शासनाने तत्काळ ओला दुष्काळ जाहीर करावा, ही प्रमुख मागणी राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाकडून करण्यात आली. सोमवारी (ता. १५) तहसीलदार अभय घोरपडे यांच्यामार्फत शरद पवार गटाच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्हाधिकारी यांना निवेदन दिले.

तालुक्यात महिन्यापासून मे प्रचंड पर्जन्यवृष्टी, तसेच धरण व बंधाऱ्यांमधून झालेल्या पाण्याच्या विसर्गामुळे नद्या–नाले तुडुंब भरून वाहत आहेत. शेतात पाणीच पाणी असल्याने परिणामी अनेक शेतकऱ्यांची उभी पिके पाण्याखाली गेली आहेत. तालुक्यातील शेकडो हेक्टर क्षेत्रातील शेतजमिनीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न उपस्थितझाला आहे. शहर व ग्रामीण भागात घरांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून अनेक कुटुंबे बेघर झाली आहेत. या कुटुंबांना तातडीने आर्थिक मदत देण्यात यावी, असेसुद्धा निवेदनात सांगण्यात आले आहे. 'सोयाबीन पिकांची वाढ झाली असली तरी सततच्या पावसामुळे शेंगा लागल्या नाहीत वा त्यात भरण झाला नाही. रोगराईने पिकांचे अतोनात नुकसान केले आहे. त्यामुळे तालुक्यातील सर्वच शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

शेवटी, एनडीआरएफच्या निकषांनुसार पिकांचे व घरांचे पंचनामे करून, ओला दुष्काळ जाहीर करण्यात यावा आणि शेतकरी, नागरिक यांना तत्काळ आर्थिक मदत द्यावी, या मागणीचे निवेदन तहसीलदार अभय घोरपडे यांना सोपविण्यात आले.यावेळी राष्ट्रवादी शरद पवार गटाचे तालुकाध्यक्ष नानासाहेब होणाडे, शहराध्यक्ष श्रीराम ठाकरे यांच्यासह मंगेश विजय कोबे, राजा ढोबळे, विजय दुबे, नंदू ढेले, अनिल बगाडे, विशाल भैसे, गणेश वाकेकर, सचिन उडाखे, सौ. संगीता मेश्राम, सौ. रजनी खंडार, मनोज शिवणकर आदींची उपस्थित होती.

# बनावट जन्म प्रमाणपत्र तपासणीसाठी शहरात एसआयटीची स्थापना

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६अमरावती**

अमरावती तहसील कार्यालयातून बनावट कागदपत्रे जोडून किंवा जन्म प्रमाणपत्राच्या तपशीलात फेरफार करून उशिरा प्रमाणपत्रे मिळवल्याप्रकरणी गाडगेनगर पोलिस ठाण्यात दाखल गुन्ह्यांसह सर्व संशयास्पद प्रकरणांचा सखोल करण्यासाठी पोलिसआयुक्तालयाने विशेष तपास पथक(एसआयटी) स्थापन केले आहे. शहर पोलिस आयुक्त अरविंद चावरिया यांनी तीन दिवसांपूर्वी याबाबत आदेश जारी केले असून, गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलिस आयुक्त शिवाजी बचाटे यांच्याकडे या पथकाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे.या एसआयटीमध्ये आर्थिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक बाबाराव अवचार, गाडगे नगरचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक अतुल वार, पोलिस निरीक्षक समाधान वाठोरे, पीएसआय रोकडे आणि काही पोलिस कर्मचारी यांचा समावेश आहे. पथकाने १८ फेब्रुवारी २०२५ रोजी गाडगे नगर पोलिस ठाण्यात नोंदवलेल्या गुन्ह्यांसह संशयास्पद प्रकरणांची चौकशी सुरू केली आहे. अमरावती तहसील कार्यालयाने ५४ संशयास्पद जन्म प्रमाणपत्रांशी संबंधित कागदपत्रे एसआयटीला उपलब्ध करून दिली असून, या कागदपत्रांचा स्रोत आणि त्यांचा वापर याचा तपास सुरू आहे.भाजप नेते व माजी खासदार



किरीट सोमय्या यांनी अमरावती, अंजनगाव सुर्जी आणि अचलपूर तहसील कार्यालयांमधून मोठ्या प्रमाणात बनावट जन्म प्रमाणपत्रे जारी झाल्याचा आरोप केला होता. यापूर्वी ग्रामीण पोलिस अधीक्षक विशाल आनंद यांनी २६ ऑगस्ट रोजी अचलपूर आणि अंजनगाव सुर्जी येथील गुन्ह्यांच्या तपासासाठी एसआयटी स्थापन केली होती. सोमय्या यांनी पाच दिवसांपूर्वी अमरावतीला भेट देऊन पोलिस आयुक्त चावरिया यांच्याशी चर्चा केली होती आणि गाडगेनगर पोलिसांच्या कारवाईच्या प्रगतीवर नाराजी व्यक्त केली होती. गेल्या सात महिन्यांत अपेक्षित प्रगती न झाल्याने चावरिया यांनी तपासाची जबाबदारी एसआयटीकडे सोपवली. एसआयटी लवकरात लवकर तपास पूर्ण करून न्यायालयात आरोपपत्र सादर करण्याच्या तयारीत आहे.

# नियमबाह्य फर्निचर खरेदी, स्वतःच्या दुकानातून साहित्य पुरवठा

## नवसारी वस्तीगृहातील गृहप्रमुख, गृहपालचा प्रताप; संजय सोळंके यांची विभागीय चौकशीची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६अमरावती**




आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृह नवसारी, अमरावती येथे मागील अनेक वर्षांपासून मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार सुरू असल्याचा धक्कादायक आरोप सामाजिक कार्यकर्ते संजय सोळंके यांनी केला आहे. गृहप्रमुख पटेल यांनी आपल्या पदाचा गैरवापर करून स्वतःच्या नातेवाईकांच्या नावे निविदा काढल्या, साहित्य खरेदीत अनियमितता केली, नियमबाह्यरीत्या फर्निचर खरेदी केली आणि रोजंदारी तत्त्वावर स्वतःचा मुलगा व पतीच्या नावे वेतन काढून शासनाची दिशाभूल केल्याचे त्यांनी उघड केले. सोळंके यांनी दिलेल्या तक्रारीनुसार स्वरा श्रद्धा इंटरप्राईजेस अँड फर्निचर, विजयलक्ष्मी महिला बचत गट, साई छाया इंटरप्राईजेस यांसारख्या संस्थांच्या नावाने वस्तीगृहाला विविध साहित्याचा पुरवठा झाला असून, हे सर्व गृहप्रमुख आणि गृहपाल यांच्या थेट नातेवाईक किंवा घरातील लोकांशी संबंधित आहेत. आपल्या अधिकारात नसतानाही फर्निचर खरेदी करून ती स्वतःच्या दुकानातून पुरवली गेली, नाममात्र साहित्य देऊन भरघोस बिले काढली गेली, तर रोजंदारी तत्त्वावर दाखवलेल्या कर्मचाऱ्यांच्या नावाने पगार काढून त्याच नावाने साहित्य पुरवठा करून शासनाला फसवले गेले. परिणामी आदिवासी विद्यार्थ्यांच्या हक्काचा लाखो रुपयांचा निधी गिळंकृत झाल्याचा आरोप त्यांनी केला आहे. या संपूर्ण प्रकरणातील गंभीरता बघता सोळंके यांनी मागणी केली आहे की मागील सात–आठ वर्षांतील सर्व साहित्य पुरवठा, निविदा प्रक्रिया, स्टॉक रजिस्टर, साहित्य वितरण रजिस्टर आणि पंचनामे यांची वरिष्ठ लेखाधिकारीमार्फत चौकशी करून दोषींवर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९, भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ आणि भारतीय न्याय संहिता २०२३ नुसार कठोर कारवाई व्हावी. त्यांनी प्रशासनाला सवाल केला की रोजंदारी कर्मचारी म्हणून पगार घेणारी व्यक्ती त्याच काळात पुरवठादार कशी असू शकते आणि वरिष्ठ परवानगीशिवाय फर्निचर खरेदी करण्याचा अधिकार गृहप्रमुखांनी कुठून मिळवला? आदिवासी विद्यार्थ्यांच्या हक्काचा निधी लाटला जात आहे. प्रशासनाने तात्काळ चौकशी करून कारवाई केली तर मोठा भ्रष्टाचार उघडकीस येईल असा ठाम विश्वास सोळंके यांनी व्यक्त केला असून या प्रकरणी तात्काळ चौकशी व्हावी आणि संपूर्ण प्रकरणात दोषींवर कठोर कारवाई केली जावी. अन्यथा विद्यार्थ्यांच्या हक्कासाठी लढा उभारण्याचा इशारा तक्रारकर्ते संजय सोळंके यांनी दिला आहे.

# चांदूरबाजार तालुक्यातील केवळ ३१.७९ टक्केच शेतकऱ्यांनी केली ई - पीक पाहणी

## नोंदणीसाठी सहा दिवसांच्या मुदतवाढीने शेतकऱ्यांना दिलासा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६अमरावती**

चांदूरबाजार शेतकऱ्यांना कृषीविषयक योजना व नुकसानभरपाईचा लाभ मिळण्यासाठी शेतकऱ्यांनी ई पाहणी करणे अनिवार्य करण्यात आले आहे. खरिपातील ई–पीक पाहणीसाठी शासनाने १४ सप्टेंबरपर्यंत मुदत दिली होतीः मात्र १५ सप्टेंबरपर्यंत चांदूरबाजार तालुक्यात केवळ २१.७९ टक्केच शेतकयांनी ई पीक पाहणी केली होती त्यामुळे ६८.२१ टक्के शेतकरी यापासून बंधित असल्याने चितचे वातावरण निर्माण झाले होते.

मात्र शासनाने ई पौक पाहणी करण्याकरिता २०सप्टेंबरपर्यंत सहा दिवसांची मुदतवाढ दिल्याने शेतकऱ्यांना थोडा दिलासा मिळाला आहे. शासकीय खरेदी केंद्रावर पीकविमा योजनेचा लाभ तसेच कृषीविषयक योजनांचा लाभघेण्यासाठी शासनाने मागील दोन वर्षापासून ई पीक पाहाणी करणे अनिवार्य केले आहे. यात ई– पीक ॲपच्या माध्यमातून पीकपेरा व शेतात लागवड केलेल्या पिकाचा लाईव्ह फोटो काढून तो जीपीएसव्दारे टंग करणे अनिवार्य केले आहे. यामुळे अनियमिततेला आळा बसला ई– पीक पाहणी असली तरी ग्रामीण भागात इंटरनेटची समस्या आहे, तरअनेक शेतकऱ्याऱ्यांकडे ॲन्ड्राईड मोबाईल नसल्याने त्यांना पीक नोदणी करण्यासाठी दुसऱ्यावर अवलंबून राहावे लागत आहे. तर मध्यल्या काळात ई–पीकनोंदणी ॲप सकाळी बंदच राहत होते परिणामी शेतकऱ्याऱ्यांना ई–पीक नोंदणी करता आली नाही, तर रात्री शेतात जावून पिकांचे लाईव्ह फोटो काढायचे कसे, असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर निर्माण झाला होता. त्यामुळेच चांदूरबाजार तालुक्यामध्ये केवळ ३९.७९ टक्केच ई– पीक पाहणी झाली आहे. चांदूरबाजार तालुक्यात एकूण पोक पाहणी करावयाची संख्या ५५ हजार

**पाच दिवसांत कशी होणार ६८.२१ टक्के नोंदणी?**

शासनाने ई– पीक पाहणीसाठी २०. सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ दिल्ली आहेः मात्र ३७ हजार ६९५ शेतकरी ई पीक पाहणीपासून वंचित आहेत. त्यातच इंटरनेटची समत्त्या असल्याने सहा दिवसांत शिल्लक ६८.२१ टक्के नोंदणी कशी होणार, असा प्रश्न निर्माण केला जात आहे.२६२ खातेदार शेतकरी आहेत. यापैकी पीक पाहणी नोंदविलेल्या प्लॉटची संख्या १७ हजार ५६७शेतकऱ्यानी ई– पीक पाहणी केली असून त्याचे प्रमाण हे केवळ ३१.७९ टक्केच आहे.

# एकच मिशन - एसटी आरक्षण

## अमरावती जिल्हाधिकारी कार्यालयावर सकल बंजारा समाजाचा आक्रमक मोर्चात शेकडोच्या संख्येने युवकांचा सहभाग

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती**

एसटी संवर्गाच्या आरक्षणासाठी आज अमरावती जिल्ह्यातील सकल बंजारा समाज आक्रमक पवित्र्यात रस्त्यावर उतरला. हजारोच्या संख्येने जमलेल्या बंजारा समाजबांधवांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक मोर्चा काढून सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी केली.

एकच मिशन - एसटी आरक्षण, हक्क आमचा देणार कोण?, हैदराबाद गॅझेट लागू करा अशा जोरदार घोषणा देत मोर्चेकरी मार्गक्रमण करत होते. महिलांचा आणि युवकांचा लक्षणीय सहभाग हे या मोर्चाचे विशेष वैशिष्ट्य ठरले. समाजातील विविध गट, संघटना आणि नेत्यांनी एकत्र येत आरक्षणाच्या मागणीचा पुनरुच्चार केला.बंजारा समाजाने हैदराबाद गॅझेटचा दाखला देत इतर जातींप्रमाणे आपल्यालाही एसटी आरक्षण देण्यात यावे, अशी ठाम भूमिका मांडली. मोर्चाच्या शेवटी समाजातील प्रमुख प्रतिनिधींनी






जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर करत एसटी आरक्षणाची अंमलबजावणी तात्काळ करण्यात यावी, अन्यथा आंदोलन आणखी तीव्र करण्याचा इशारा दिला.

# तळेगाव ठाकूर मधील ग्रामस्थ आंदोलनाच्या उंबरठ्यावर

## दररोज वीज गायब, नेटवर्क ठप्प, योजना फक्त कागदावर




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६ तळेगाव ठाकूर**

गावात दिवसेंदिवस वाढणाऱ्या समस्या आणि प्रशासनाच्या उदासीनतेमुळे तळेगाव ठाकूरचे नागरिक संतप्त झाले आहेत. सतत खंडित होणारा वीजपुरवठा आणि ठप्प मोबाईल सेवा या गंभीर समस्यांमुळे त्रस्त झालेल्या ग्रामस्थांनी सोमवारी (दि. १५ नोव्हेंबर २०२५) तिवसा तहसील कार्यालयात तहसीलदारांची भेट घेऊन लेखी निवेदनाद्वारे तीव्र आंदोलनाचा इशारा दिला.

गावाचा वीजपुरवठा मोझरी फीडरवर असल्याने दिवसभरात अनेकदा वीज येते-जाते. त्यामुळे घरगुती उपकरणे, व्यवसाय, विद्यार्थी, शेतकरी आणि रोजंदारी करणारे सर्वजण हवालदिल झाले आहेत. वीज नसल्यामुळे गावातील मोबाईल टॉवर्सदेखील काम करत नाहीत, परिणामी मोबाईल नेटवर्क पूर्णपणे ठप्प असते. यामुळे ऑनलाईन शिक्षण, बँक व्यवहार, आणि आपत्कालीन संपर्क पूर्णपणे विस्कळीत झाला आहे.


> याशिवाय संजय गांधी निराधार योजना देखील गावात फक्त नावापुरती उरली आहे. अनेक पात्र लाभार्थ्यांना महिन्यांपासून पेमेंट नाही, तर काहींना तहसीलच्या फेऱ्या माराव्या लागत आहेत. वृद्ध, महिला आणि दिव्यांग नागरिकांना यामुळे मोठा त्रास सहन करावा लागत आहे.
>
> **डॉ. राजेंद्र पालीवाल**

> वीजपुरवठा दिवसातून कित्येक वेळा खंडित होतो, पण बिल मात्र नेहमीप्रमाणे येते. मोबाईल टॉवर बंद पडल्याने नेटवर्कही राहत नाही. आमचे दैनंदिन आयुष्य अक्षरशः खोळंबले आहे.
>
> **सविता किरण उमप**
> **गृहिणी**

# बिझिलँड मार्केटमधील 'कला निकेतन' फॅशन दुकानाला भीषण आग

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती**

अमरावती शहरातील प्रसिद्ध बिझिलँड मार्केटमधील ड४ लाईनमध्ये असलेल्या 'कला निकेतन' या फॅशन दुकानाला आज सकाळी अंदाजे ९ वाजण्याच्या सुमारास भीषण आग लागली. या आगीत दुकानातील कपड्यांचे आणि इतर साहित्याचे लाखोंचे नुकसान झाले आहे.



शॉर्ट सर्किटमुळे आग लागल्याचा प्राथमिक अंदाज वर्तविण्यात येत आहे. आग इतकी तीव्र होती की ती आटोक्यात आणण्यासाठी अग्निशमन दलाचे तब्बल ८ बंब घटनास्थळी दाखल करण्यात आले. बंबांच्या मदतीने काही तासांच्या प्रयत्नानंतर आग नियंत्रणात आणण्यात यश आले. सुदैवाने या आगीत कोणतीही जीवितहानी झाल्याचे वृत्त नाही. मात्र व्यापाऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून, स्थानिक प्रशासन व पोलिसांकडून याप्रकरणी पुढील तपास सुरू आहे.

# शिंदेंच्या शिवसेनेत अंतर्गत धुसफूस? प्रीती बंड यांचा फोटो बॅनरवरून गायब

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६ अमरावती**

अमरावतीत शिंदे गटाच्या शिवसेनेमध्ये अंतर्गत धुसफूस उफाळून आली आहे. माजी आमदार ज्ञानेश्वर धाने पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त लावण्यात आलेल्या शिवसेना शिंदे गटाच्या बॅनरवरून पक्षाच्या उपनेत्या प्रीती बंड यांचा फोटो गायब असल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.गेल्याच काही महिन्यांपूर्वी प्रीती बंड यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत अधिकृतरित्या शिवसेनेत (शिंदे गट) प्रवेश केला होता. त्यानंतर त्यांची पक्षात उपनेत्या म्हणून नेमणूकही झाली होती. त्याच पक्षात ज्ञानेश्वर धाने पाटील यांनी देखील प्रवेश केला होता.मात्र, त्यांच्या




वाढदिवसाच्या निमित्ताने अमरावती शहरात लावण्यात आलेल्या भव्य शुभेच्छा बॅनरवर प्रीती बंड यांचा कुठेही उल्लेख नसल्याने पक्षातील अंतर्गत नाराजी, गटबाजीचे संकेत मिळू लागले आहेत.या प्रकारामुळे राजकीय विश्लेषक आणि स्थानिक कार्यकर्त्यांमध्ये उलटसुलट चर्चा सुरू असून, काहींनी यामागे जाणूनबुजून केलेला अपमान असल्याचा आरोपही केला आहे. दुसरीकडे, प्रीती बंड समर्थक कार्यकर्त्यांमध्ये संतापाचे वातावरण असून, त्यांनी यावर पक्षश्रेष्ठींनी लक्ष घालावे, अशी मागणी केली आहे.पक्षांतर्गत हे संकेत शिंदे गटासाठी अडचणीचे ठरू शकतात, असे निरीक्षण राजकीय जाणकार व्यक्त करत आहेत.

# पोस्टर कुठे लावावे हे ही शिकवावं लागेल का? अमरावतीत फडणवीस यांच्या पोस्टरचा अपमान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती**

अमरावती शहरात महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय पक्षांकडून सुरू असलेल्या जाहिरातबाजीने वाद निर्माण केला आहे. सोमवारी (ता. १५) काही युवकांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या छायाचित्र असलेली पोस्टर्स कचराकुंड्या, सार्वजनिक मुत्रीघरे आणि गलिच्छ ठिकाणी लावल्यामुळे नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण पसरले आहे.

या प्रकाराचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर जनमानसात तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.




संबंधित युवक छिंदवाडा येथील असल्याचे सांगत होते आणि त्यांना फक्त पोस्टर लावण्याचे काम देण्यात आले होते. मात्र त्यांनी कुठे लावावे, याचे भान ठेवले नाही, की जाणूनबुजून दुर्लक्ष केले? - हा मोठा प्रश्न उपस्थित होतो.

शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला अभिवादन करणाऱ्या मुख्यमंत्र्यांचे छायाचित्र असलेले पोस्टर, कचराकुंड्यांवर झळकणं हे फक्त राजकीय बेफिकीरीचं लक्षण नसून, जनभावना आणि इतिहासाचा अपमानही आहे, अशी नागरिकांची तीव्र भावना आहे.युवकांना थांबवण्याचा प्रयत्न केल्यानंतरही त्यांचे काम सुरूच होते, हे त्यांच्या राजकीय संवेदनशीलतेवर प्रश्नचिन्ह उभं करतं. मध्यवस्तीतील नागरिकांनी यावर तातडीने प्रतिक्रिया दिल्या असून, यामुळे स्थानिक पातळीवर पक्षाच्या प्रतिमेला तडा गेला आहे.

> **शिवरायांचे पोस्टर; युवक काँग्रेसचा संताप**
>
> अमरावती शहरातील घाणीच्या साम्राज्यात लावण्यात आलेल्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या फोटो असलेल्या पोस्टरवरून युवक काँग्रेसने तीव्र आक्षेप नोंदवला आहे. शिवरायांचा अपमान झाल्याचा आरोप करत युवक काँग्रेसने पोस्टरवर कागद लावून निषेध आंदोलन केले. या प्रकारावर कारवाईची मागणी करत त्यांनी सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी केली.

# जनतेच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष; आक्रोश जनशक्ती संघटनेचे अध्यक्ष सुशिल बेले यांचे तहसीलसमोर आमरण उपोषण सुरू

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६वरुड**

जनतेच्या मूलभूत व तातडीच्या प्रश्नांकडे प्रशासन सातत्याने दुर्लक्ष करीत असल्याच्या निषेधार्थ आक्रोश जनशक्ती संघटनेचे अध्यक्ष सुशिल बेले यांनी दि. १६ सप्टेंबरपासून वरुड तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे. आज उपोषणाचा दुसरा दिवस असून, प्रशासनाच्या भूमिकेवरून




जनतेत तीव्र असंतोष निर्माण झाला आहे.

१४ जुलै २०२५ रोजी तहसील प्रशासनासह नगर परिषदेला सादर करण्यात आलेल्या लेखी निवेदनात त्यांनी एकूण २० हून अधिक महत्त्वाच्या मागण्या मांडल्या होत्या. या मागण्यांमध्ये शेतकऱ्यांना विमा व गारपीट नुकसानभरपाई, दर्जाहीन पांधनरस्त्यांवरील कारवाई, रेती तस्करीविषयी पारदर्शक माहिती, वन्यप्राण्यांमुळे झालेल्या नुकसानीसाठी ९०% मोबदला, तसेच विविध अपूर्ण कामांबाबत तातडीच्या उपाययोजनांचा समावेश होता.

प्रशासनाला ३१ जुलै व ३१ ऑगस्टपर्यंत कार्यवाही करण्याचे आदेश दिले गेले होते. मात्र, अद्याप कोणतीही ठोस कृती करण्यात आलेली नाही, त्यामुळे जनता फसवल्याचा आरोप संघटनेकडून करण्यात आला आहे. बेले यांनी इशारा दिला आहे की, मागण्या मान्य न झाल्यास उपोषण अधिक तीव्र होईल व त्याची संपूर्ण जबाबदारी प्रशासनावर असेल.तालुक्यात प्रशासनाविरोधात रोषाचे वातावरण निर्माण झाले असून, या आंदोलनाला लवकरच मोठ्या प्रमाणात जनसमर्थन लाभण्याची शक्यता आहे.

# अंजनगाव सुर्जीमध्ये गुंतवणुकीच्या आमिषाने फसवणूक

## ठाणेदार बोंडे यांचे गुंतवणूकदारांना आवाहन



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अंजनगाव सुर्जी**

तालुक्यात त्रिमूर्ती ठगांच्या टोळीने कोट्यवधी रुपयांची फसवणूक केल्याची प्रकरणे उघडकीस येत असताना, अंजनगाव सुर्जी पोलीस ठाण्याचे ठाणेदार सुरज बोंडे यांनी गुंतवणूकदारांना फसव्या आमिषांना बळी न पडण्याचे आवाहन केले आहे.

औरंगाबाद येथील जवाई, संत्रा व्यापारी आणि निवृत्त वडिलांच्या मदतीने या टोळीने तालुक्यातील गुंतवणूकदारांना १ लाखावर ६० हजार रुपये वार्षिक व्याज देण्याचे आमिष दाखवले. त्यांनी कंपनीचा बनावटी बिझनेस दाखवून करोडो रुपयांची माया जमवली असून, हे प्रकरण आता उघडकीस येत आहे.ठाणेदार बोंडे म्हणाले की, अशा प्रकारचे परतावे कोणतीही अधिकृत कंपनी, बँक किंवा पतसंस्था देऊ शकत नाहीत. अशा आमिषामागे फसवणुकीचा कट असतो. कोणतीही गुंतवणूक संस्था रिझर्व्ह बँकेच्या अधीन काम करते, आणि उच्च व्याजदर हे धोक्याचे लक्षण असते.दरम्यान, राज्य सरकारकडून गुंतवणूकदारांच्या हितासाठी १९९९ च्या कायद्यात सुधारणा करण्याचे आश्वासन दिले असले तरी, अंमलबजावणी अभावी बोगस कंपन्या फोफावत आहेत. अशा फसवणुकीपासून वाचण्यासाठी व्यापक जनजागृतीची गरज असल्याचेही बोलले जात आहे.

# नांदगाव पेठच्या टोलवर होतेय झोल

## एकाच क्रॉसिंगचे दोनदा कापले जाताहेत पैसे, तक्रारींचीही दखल नाही

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती**

अमरावती ते नागपूर या राष्ट्रीय महामार्गावरील नांदगाव पेठ आणि कारंजा या दोन टोल प्लाझा नाक्यावर एकाच क्रॉसिंगचे दोन वेळा शुल्क कपात करण्यात आल्याची धक्कादायक बाब शनिवार, १३ सप्टेंबर रोजी निर्दशनास आली आहे. वाहनचालकांकडे वार्षिक पास असताना एकाच क्रॉसिंगवर दोनदा शुल्क कपात होत असल्याबाबत टोल फ्री क्रमांकावरही तक्रार करण्यात आली. मात्र, याचा काहीही फायदा झाला नाही. ऑनलाइन शुल्क कपात होऊन वाहनधारकांना फटका बसला, हे विशेष.

टोल फ्री क्रमांकावर केलेल्या तक्रारीनुसार, कारंजा घाडगे या टोल नाक्यावरून १३ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजून १७ मिनिटांनी वार्षिक पासधारक एमएच २७ डीई ९४९८ या क्रमांकाच्या वाहनाने क्रॉसिंग केले. मात्र, १९४ फेऱ्या शिल्लक असताना बँक खात्यातून शुल्क




कपात करण्यात आले. या अफलातून प्रकाराने संबंधित वाहनधारक हैराण झाले. तेव्हा त्यांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणच्या १०३३ या टोल फ्री हेल्पलाइनवर कॉल केला. मात्र, ऑनलाइन तक्रार नोंदविली, लवकरच समस्या निकाली काढू, असे सांगण्यात आले. पुढे हेच वाहन नांदगाव टोल प्लाझा येथे १० वाजून २६ मिनिटांनी क्रॉसिंग झाले असता १९५ फेरी लेफ्ट झाले, असे दर्शविले.

खरे तर वार्षिक टोल क्रॉसिंग पास असताना एकाच क्रॉसींगवर दोनदा शुल्क कपात 'ये बात कुछ हजम नहीं' असाच काहीस प्रकार राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणकडून निरंतरपणे सुरू असल्याची ओरड वाहनचालकांची आहे. वार्षिक टोल पास हाताळणे सुलभ व्हावे, यासाठी ही सुविधा आहे. मात्र, नांदगाव पेठ आणि कारंजा घाडगे या टोल प्लाझावर एकदा वाहन क्रॉसिंग झाल्यानंतर दोनदा ऑनलाइन शुल्क कपात झाल्याने वाहनधारक त्रस्त झाले आहेत. अमरावती ते नागपूर या मार्गावर ३ टोल प्लाझा नाके आहेत. यात गोंडखैरी / कोंडाली, कारंजा घाडगे आणि नांदगाव पेठ या नाक्याचा समावेश आहे. यासंदर्भात नागपूर येथील राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणचे कार्यकारी अभियंता गजानन पळसकर यांच्याशी संपर्क साधला असता ते उपलब्ध झाले नाही, हे विशेष.


आता आपल्या मोबाईल वरच वाचा
राज्यासह जिल्ह्यातील महत्वाच्या घडामोडी
प्रिंट
पिडीएफ
ई- पेपर
वेबपोर्टल
दररोज रात्री 8 वाजता वाचा
निवांत!!
सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
राजकीय,सामाजिक,कृषी,शैक्षणिक,क्रीडा,क्राईम
विश्वातील सर्व घडामोडी वाचा आता आमच्या सोबत